दैनिक
# संध्या
निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

मंगळवार, दि. ०९ जून २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# पायाभूत सुविधा उभारा : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**

'महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळा'मार्फत (महारेल) करण्यात येणाऱ्या एकूण १३१ पैकी पहिल्या टप्प्यात ६५ कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'महारेल'च्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रात रेल्वे फाटकमुक्त होण्यासाठी पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृहात ही बैठक झाली. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला. सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आमदार प्रसाद लाड बैठकीस उपस्थित होते. राज्यातील सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील (अंडर पास) रस्त्याची कामे



**रेल्वेच्या ६५ पायाभूत सुविधांच्या कामांना मान्यता**

महारेलमार्फत करण्यात येणार आहेत. त्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध निर्देश दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्रात एकही रेल्वे मार्गावर फाटक राहता कामा नये. रेल्वे फाटक मुक्त महाराष्ट्रासाठी रेल्वे पायाभूत सुविधा उभारण्यात याव्यात; तसेच महानगरांमध्ये रेल्वे मार्गाच्या आजूबाजूला असलेले वाढते शहरीकरण लक्षात घेता अशा भागात गरजेनुसार नागरिकांच्या सुलभ दळणवळणाकरिता पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात यावीत. मान्यता देण्यात आलेल्या ६५ कामांमधील संबंधित रस्त्यांवरील २५ हजार ते १ लाखापर्यंत 'टीव्हीयू' (ट्रेन व्हेईकल युनिट) असलेल्या आणि कमीत कमी भूसंपादन आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. वाढते शहरीकरण लक्षात घेता शहरांमधील रेल्वे पायाभूत सुविधांची ८० कामे नियोजित करण्यात आली आहेत. या कामांसाठी संबंधित महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची समिती स्थापन करण्यात यावी. समितीने नियोजित कामाविषयी पडताळणी करावी. त्यानंतर ते काम महारेल हाती घेईल. ही कामे पूर्ण झाल्यास या भागातील नागरिकांना त्यांच्या मागणीआधीच पायाभूत सुविधा मिळतील, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नागपूर शहरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलावर चौकाच्या ठिकाणी भविष्यातील वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे. अशा ठिकाणी वाहतूक कोंडी टाळण्याची कार्यवाही करावी. अमरावती- बडनेरा मार्गावरील जुना रेल्वे उड्डाण पूल असून याठिकाणी नवीन रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात यावा. महारेलने कामांचे प्राधान्यक्रमानुसार टप्पे पाडावेत. पायाभूत सुविधांच्या कामांसाठी हुडकोकडून कर्ज उपलब्ध करून घ्यावे. हुडकोने बँकांकडून कर्ज न घेता वेगळी व्यवस्था उभारून बाजारातील स्पर्धेचा अंदाज घेत शासनाला दिलेल्या कर्जावरील व्याज कमी आकारावे. त्याचबरोबर महारेल हे महामंडळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आणण्यासाठी कार्यवाही गतीने पूर्ण करावी. महारेलमार्फत पूर्ण करण्यात आलेल्या कामांचे देयक राज्य शासनाकडून तातडीने अदा करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

## ममतांचे २८ पैकी २० खासदार फुटले

### NDA ला पाठींबा देणार


**कोलकाता (दै. संध्या)**



आमदारांनंतर आता तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनीही ममता बॅनर्जी यांची साथ सोडली आहे. 'पीटीआय'च्या वृत्तानुसार, पक्षाच्या २८ लोकसभा खासदारांपैकी २० खासदारांनी एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. खासदार आणि टीएमसीच्या माजी नेत्या काकोली यांनी सोमवारी हा दावा केला. त्या म्हणाल्या, 20 खासदारांनी एनडीएला पाठिंबा देण्याचे ठरवले आहे. यासंदर्भात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना एक पत्रही पाठवण्यात आले आहे. यापैकी 11 खासदारांनी सोमवारी दुपारी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे बंगालचे प्रभारी भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी बैठक घेतली. या बैठकीदरम्यान सुवेंदू अधिकारीही त्यांना भेटण्यासाठी तिथे पोहोचले होते. या बैठकीला लोकसभा खासदार काकोली घोष, शताब्दी रॉय, अबू ताहिर, अरूप चक्रवर्ती, खलीलुर रहमान, शर्मिला सरकार, असित मल, कालीपदा सोरेन, जगदीश बसुनिया आणि प्रसून बॅनर्जी उपस्थित होते. वृत्तसंस्था पीटीआय नुसार, रविवारी रात्री उशिरा दिल्लीतील एका अज्ञात ठिकाणी TMC च्या २० खासदारांनी अनौपचारिक बैठक घेतली. या बैठकीत खासदारांनी पक्षाच्या सध्याच्या नेतृत्व रचनेबाबत नाराजी व्यक्त केली. सोमवारी या बैठकीचे एक छायाचित्र सोशल मीडियावर समोर आले, ज्यामध्ये TMC चे अनेक खासदार एका टेबलाभोवती बसलेले दिसत आहेत. एका खासदाराने छायाचित्र काढल्यामुळे वाद निर्माण झाला. या छायाचित्रात सुखेंदू शेखर राय हे देखील बसलेले दिसत आहेत. टीएमसीचे ज्येष्ठ नेते सुखेंदू शेखर यांनी आज सकाळी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि पक्ष सोडला. आपल्या राजीनामा पत्रात त्यांनी पक्षाच्या पराभवासाठी ममता यांच्या १५ वर्षांच्या "अस्ताव्यस्त" कारभाराला जबाबदार धरले आणि भाजपची प्रशंसा केली.

## मी नाराज नाही, भाजपने विरोध केला यात तथ्य नाही : छगन भुजबळ

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून राज्यसभा उमेदवारीचा विषय चर्चेत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना राज्यसभेत पाठवले जाईल, अशी जोरदार चर्चा होती. मात्र, शेवटच्या क्षणी चित्र बदलले आणि उमेदवारी राजेंद्र जैन यांच्या गळ्यात पडली. या घडामोडीमागे केवळ उमेदवारीचा प्रश्न नसून, भुजबळांनी घातलेली एक राजकीय अट आणि महायुतीतील सत्तासमीकरणे असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. दरम्यान, राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी डावलल्याने नाराज असल्याच्या चर्चांवर छगन भुजबळांनी प्रतिक्रिया दिली आहे. भुजबळ म्हणाले, राज्यसभा किंवा लोकसभा असेल, चार-पाच वेळा आलेल्या या संधी दुर्दैवाने हाती लागल्या नाहीत. यावेळी वाटलं होतं की जाऊ. अनेक ठिकाणी मुलं मंत्री किंवा खासदार आहेत. मकरंद पाटील, सुनेत्रा ताई, शिंदे साहेब, तटकरेंचं तसं आहे. म्हणून मलासुद्धा वाटलं की, मुलाला मंत्रिपद द्या आणि मी राज्यसभेवर जातो. मला वाटतं की वरती कम्युनिकेट करायला वेळ लागला असेल, याची शक्यता नाकारता येत नाही. भाजपकडे प्रस्ताव मांडल्यानंतर शेवटचा एकच दिवस होता, आणि एका दिवसामध्ये त्यांचे असे उत्तर आले की, ज्यावेळी मंत्रिमंडळाचा विस्तार होईल त्यावेळी विचार करू. म्हणूनच भाजपने नकार दिला या बातमीत काहीही तथ्य नाही. मी नाराज वगैरे काही नाही. इतर नेते जसे वर किंवा खाली मंत्री वा खासदार आहेत, सोबतच त्यांची मुलंही मंत्रिपदी किंवा वर लोकसभा, राज्यसभेत आहेत, तसाच न्याय मला मिळावा अशी माझी मागणी होती. सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यसभा उमेदवारीसाठी छगन भुजबळ यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून त्यांना दिल्लीत पाठवण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली होती. मात्र, भुजबळ यांनी पक्ष नेतृत्वासमोर एक महत्त्वाची अट ठेवल्याचे सांगितले जात आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीला जाणार?

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्राच्या राजकारणात मुख्य मंत्रिपदाचा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. शिवसेनेचे नेते बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रिपदावर पाहण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर महायुतीच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. कडू यांनी केवळ शिंदेंना मुख्यमंत्री करण्याची मागणी केली नाही, तर विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रात मोठी जबाबदारी मिळावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली. त्यामुळे "फडणवीस दिल्लीला जाणार का?" आणि "शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार का?" अशा चर्चांना राजकीय वर्तुळात वेग आला. मात्र, या सर्व चर्चांवर भाजपचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट भूमिका मांडत मुख्यमंत्री बदलाच्या शक्यता फेटाळून लावल्या आहेत.

बच्चू कडू यांनी एका कार्यक्रमात बोलताना म्हटले की, राज्याचा मुख्यमंत्री आपल्या पक्षाचा असावा, अशी भावना प्रत्येक शिवसैनिकाची असू शकते. त्यांनी पुढे सांगितले की, देवेंद्र फडणवीस यांना राष्ट्रीय पातळीवर मोठी जबाबदारी मिळावी आणि राज्याचे नेतृत्व पुन्हा एकनाथ शिंदे यांच्याकडे यावे, अशी त्यांची वैयक्तिक इच्छा आहे. कडू यांच्या या वक्तव्यामुळे महायुतीतील अंतर्गत समीकरणांबाबत नव्याने चर्चा सुरू झाली.

बच्चू कडू यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, देवेंद्र फडणवीस दिल्लीला जावेत की नाही, याचा निर्णय घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. ते म्हणाले, "महायुतीला जनतेने 51 टक्क्यांहून अधिक मतांसह स्पष्ट बहुमत दिले आहे. हे राज्यातील सर्वात मजबूत सरकार आहे. आम्ही एकत्र आहोत. देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्राचा संकल्प केला असून राज्याला देशातील अग्रगण्य राज्य बनवण्याचे त्यांचे लक्ष्य आहे." फडणवीस दिल्लीला जाणार असल्याच्या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचा स्पष्ट संदेश त्यांनी दिला.

बावनकुळे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या चर्चांवर अप्रत्यक्ष नाराजीही व्यक्त केली. ते म्हणाले की, अशा संवेदनशील विषयांवर सार्वजनिक व्यासपीठावर किंवा गावोगावी चर्चा करून भूमिका मांडणे योग्य नाही. महायुतीमध्ये समन्वय समितीची व्यवस्था आहे आणि कोणत्याही महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी योग्य मंच उपलब्ध आहे.

**■ बच्चू कडूंच्या मुख्यमंत्री बदलाच्या मुद्द्यावर बावनकुळेंचे रोखठोक उत्तर; म्हणाले- त्यांच्या नेतृत्वाची महाराष्ट्राला गरज!**

त्यामुळे मुख्यमंत्रिपदासारख्या विषयांवर सार्वजनिक विधान करताना संयम बाळगण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

मुख्यमंत्रिपदाच्या मागणीवर बोलताना बावनकुळे यांनी महायुतीतील वास्तव स्वीकारले. "प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना आपला नेता मुख्यमंत्री व्हावा असे वाटत असते. ती भावना स्वाभाविक आहे. मात्र, महायुतीने एकमताने देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली आहे," असे ते म्हणाले. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाचा विषय आता बंद झाला असून सरकार पूर्ण कार्यकाळ पूर्ण करेल, असे संकेत त्यांनी दिले.

बच्चू कडू यांच्या वक्तव्याला शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत यांनीही पाठिंबा दिला. सामंत म्हणाले की, बच्चू कडू यांनी व्यक्त केलेली भूमिका त्यांची वैयक्तिक भूमिका आहे. मात्र एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावेत, अशी इच्छा केवळ कडूंचीच नाही तर शिवसेनेच्या अनेक कार्यकर्त्यांची आहे. "जशी भाजपच्या कार्यकर्त्यांना देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत असे वाटते, तशीच आमची इच्छा शिंदे साहेब मुख्यमंत्री व्हावेत अशी असते," असे सामंत म्हणाले. मात्र, त्यांनीही ही मागणी वैयक्तिक भावना असल्याचे स्पष्ट केले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




## वादळी पावसाने केळी आणि ऊस उत्पादकांचे मोठे नुकसान

# कर्जमाफिचे काही निकष अडचणीचे : शरद पवार

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यातील शेतकरी कर्जमाफी, वादळी पावसामुळे झालेले पिकांचे नुकसान आणि INDIA आघाडीची आगामी रणनीती या महत्त्वाच्या मुद्द्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत भूमिका स्पष्ट केली. राज्य सरकारच्या कर्जमाफी योजनेतील निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना त्यांनी सरकारने शेतकऱ्यांशी संवाद साधून निर्णयात आवश्यक दुरुस्ती करावी, असा सल्ला दिला. त्याचवेळी INDIA आघाडीच्या बैठकीला पक्षाच्या नेत्या सुप्रिया सुळे उपस्थित राहणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

दिल्लीमध्ये आज होत असलेल्या INDIA आघाडीच्या बैठकीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, देशातील एकूण राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यांच्या मते, ही कोणत्याही मोठ्या राजकीय निर्णयासाठी बोलावलेली बैठक नसून "जनरल रिव्ह्यू मीटिंग" आहे. आघाडीतील कोणत्याही पक्षाने टोकाची भूमिका घेऊ नये, असा संदेश या बैठकीत दिला जाण्याची शक्यता आहे. पवार म्हणाले की, आगामी लोकसभा किंवा विधानसभा निवडणुका लगेच नसल्याने विरोधी पक्षांकडे संघटन मजबूत करण्यासाठी आणि परस्पर समन्वय वाढवण्यासाठी पुरेसा वेळ आहे. त्यामुळे विरोधकांनी मतभेद बाजूला ठेवून एकत्र काम करण्याची गरज आहे. विशेष म्हणजे अलीकडे INDIA आघाडीतील काही पक्षांमध्ये मतभेदांच्या चर्चा सुरू असताना पवारांचे हे वक्तव्य महत्त्वाचे मानले जात आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीबाबत अनेक शेतकरी संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. कर्जमाफीसाठी घालण्यात आलेल्या अटी आणि पात्रतेच्या निकषांमुळे मोठ्या संख्येने शेतकरी योजनेबाहेर राहतील, अशी टीका होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना शरद पवार म्हणाले की, शेतकऱ्यांच्या तक्रारी गांभीर्याने घेण्याची गरज आहे. त्यांनी स्पष्ट केले की, सरकारचा निर्णय पूर्णपणे चुकीचा आहे असे म्हणणे योग्य नाही. मात्र त्यामध्ये काही व्यावहारिक अडचणी आहेत. त्यामुळे हा निर्णय थेट फेटाळण्याऐवजी त्यातील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कर्जमाफीबाबत स्वतः पुढाकार घेणार असल्याचे संकेतही पवारांनी दिले. ते म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि देशातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून कर्जमाफीतील निकषांमध्ये

> "लोकशाहीत सरकारने लोकांशी संवाद साधला पाहिजे. लोकांच्या अडचणी समजून घेत निर्णयात आवश्यक बदल करण्याची तयारी दाखवली पाहिजे," असे पवार म्हणाले.

सुधारणा करता येते का, याचा प्रयत्न केला जाईल. राज्यातील अनेक शेतकरी संघटना कर्जमाफीच्या निकषांवर नाराज असल्याने पवारांची ही भूमिका सरकारवरील दबाव वाढवणारी ठरू शकते. गेल्या काही दिवसांत राज्यातील अनेक भागांत वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे.

विशेषतः उत्तर महाराष्ट्रातील केळी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. याबाबत बोलताना शरद पवार यांनी सांगितले की, त्यांच्याकडे नुकसानाचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला आहे. विशेषतः केळी आणि ऊस पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी तज्ज्ञांची टीम पाठवण्यात आली होती. त्या पथकाचा अहवाल आता प्राप्त झाला असून त्याचा अभ्यास करून पुढील भूमिका निश्चित केली जाणार आहे.

# वाढती महागाईवरून काँग्रेस आक्रमक

### काँग्रेसने चुलीकडून गॅसवर आणले, भाजपने देशाला पुन्हा चुलीकडे नेले- विजय वडेट्टीवार

**नागपूर (दै. संध्या)**



देशातील सध्याच्या परिस्थितीवरून विरोधकांनी सरकारची कोंडी करण्याचे जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. महागाईच्या विरोधात काही दिवसांपूर्वीच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने नवी मुंबई येथे आंदोलन केले होते. त्यानंतर आता काँग्रेसनेही सरकारवर हल्लाबोल केला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्र सरकारवर टीका करताना म्हटले की, काँग्रेसने देशाला चुलीकडून गॅसकडे नेले, देशाला पुन्हा गॅसकडून चुलीकडे नेण्याचे काम भाजप करत असल्याची टीका त्यांनी केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले, हे सरकारचे धोरणच आहे, हीच सरकारची उपलब्धी आहे. आम्ही चुलीवरून गॅसवर आणले आणि आता या सरकारने गॅसवरून चुलीकडे नेण्याचा निर्धार केला आहे. ही परिस्थिती आता महाराष्ट्रात तयार झाली आहे. हजार रुपयांचे सिलिंडर तर आत्ता झाला आहे, पुढचा महिना थांबा हेच सिलिंडर 1500 वर पोहोचेल आणि लोक पुन्हा चुलीकडे येतील. आता चुलीतला कोलीत घेऊन सरकारला कसे चटके द्यायचे आहेत हे जनता ठरवेल. पण एक सांगतो की सामान्य माणूस आणि माध्यमवर्ग असेल किंवा गरीब माणूस असेल ते चुलीवर स्वयंपाक करून डोळ्यात धूर घालून त्याच्या डोळ्यातले अश्रू पुन्हा जोराने वाहतील अशीच व्यवस्था या सरकारने केली आहे. पुढे बोलताना विजय वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर भाष्य करत सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, सरकारच्याकडे आहे काय कर्जमाफी करायला? त्यांनी आम्ही दिलेल्या कर्जमाफीमध्ये 2019 पासूनच्या त्या लोकांना सुद्धा वगळून टाकले आहे. जे आम्ही 50 हजार रुपये प्रोत्साहन देत होतो, त्यातील शेतकऱ्यांची संख्या कमी करून टाकली आहे. आणि या कर्जमाफीचा थेट फायदा होणारच नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले, सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी ही सरसकट माफी नसून अटी आणि शर्थी लावून दिलेली कर्जमाफी आहे. त्यामुळे ती संख्या दाखवत आहेत ती संख्या सुद्धा यात बसणार नाही. याचे कारण असे आहे की, 2 लाख रुपये भरतील पण 3 लाख दिल्याशिवाय त्यांना पुन्हा नवीन कर्ज मिळणारच नाही. तर ते देण्याची ऐपत शेतकऱ्याकडे नाही. म्हणजे यांचे 2 लाख देऊन उपयोग नाही आणि ते 3 लाख भरल्याशिवाय त्याचे ते 2 लाख रुपये देणार नाहीत. त्यामुळे मला असे वाटते की हा आकडा फार तर 15-20 लाखांच्या आसपास जाईल. याचा शेतकऱ्यांना फायदा होणार नसून ही फसवी आणि बनवाबनवीची कर्जमाफी असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.

## संपादकीय

# ‘अराजकीय’ वाटणारा मंच अचानक लोकप्रिय होतो, तेव्हा...

गेल्या शनिवारी, ६ जून २०२६ रोजी दिल्लीच्या जंतर-मंतरवर हजारोंच्या संख्येने तरुण विद्यार्थी, पत्रकार, इन्फ्लुएन्सर्स आणि पोलिसांचा प्रचंड ताफा गोळा झाला होता. अभिजित दीपके यांनी जेमतेम पंधरा दिवसांपूर्वी स्थापलेल्या ‘कॉक्रोच जनता पार्टी’चं हे जमिनीवरचं पहिलं आंदोलन होतं. काल हाक दिली आणि आज देशव्यापी आंदोलन उभं राहिलं असं होत नसलं, तरी सोशल मीडियावर गाजणाऱ्या एखाद्या गोष्टीला प्रत्यक्ष जमिनीवर प्रतिसाद मिळेलच याची शाश्वती नसते. तरीही, अगदी काही दिवसांपूर्वी जाहीर केलेल्या या झुरळांच्या आंदोलनासाठी देशातल्या विविध राज्यांमधून प्रवास करून तरुण राजधानीत पोहोचले. हे आंदोलन जंतर-मंतरने पाहिलेल्या इतिहासातल्या अनेक आंदोलनांपेक्षा संख्याबळाच्या दृष्टीने फार मोठं नव्हतं, मात्र ‘गोदी मीडिया’ला पळवून लावा अशी घोषणा करूनही या आंदोलनाने मुख्य प्रवाही माध्यमांचंही लक्ष वेधून घेतलं. अर्थात, एखाद्या पक्षाचा किंवा मोठ्या राजकीय संघटनेचा उघड पाठिंबा या आंदोलनाला नसावा, असं प्रत्यक्षदर्शींना लक्षात आलं. एकुणात आंदोलनांची काही एक व्यवस्था असते, कुठेतरी एक मंच असतो, माईक असतात, या साध्या गोष्टींचाही कालच्या निदर्शनांमध्ये विचार केलेला दिसला नाही. अर्थात, मीडियाशी बोलणाऱ्या तरुणांची पेपर लीक आणि त्याबाबत होणाऱ्या अन्यायाविरुद्धची तळमळ दिसत होती, राग दिसत होता. पुन: पुन्हा होणाऱ्या पेपर लीकची, त्यामुळे झालेल्या विद्यार्थी आत्महत्यांची जबाबदारी घेऊन शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, एवढी एकच प्रमुख मागणी घेऊन जंतर-मंतरवरचं हे आंदोलन झालं. विद्यार्थ्यांना, तरुणांना गृहीत धरून हे सरकार चाललं आहे, आपल्या अपयशांची जबाबदारी न घेता, कोणत्याही उत्तरदायित्वाशिवाय यांचं राजकारण चाललं आहे, असा बहुसंख्य आंदोलकांचा सूर दिसला. राजकीय पक्षांशी जोडलेल्या विविध विद्यार्थी संघटनांनी देखील गेले काही महिने हा मुद्दा लावून धरला होता, मात्र त्याची म्हणावी तशी दखल घेतली गेली नाही.

गेल्या काही वर्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या, तरुणांच्या राजकारणासाठीच्या जागा वेगाने कमी होत आहेत. ज्या कॉलेजांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थी निवडणुका होतात, एक राजकीय वातावरण असतं, अशी ठिकाणं मुळात बोटांवर मोजण्याइतकीच उरली आहेत. बहुसंख्य विद्यार्थ्यांची इच्छा असूनही आपले मुद्दे मांडायला, उत्तरदायित्वाची मागणी करायला त्यांच्याकडे व्यासपीठच नाही. जिथे अशा प्रकारच्या राजकारणाला एकेकाळी खूप चांगली संधी होती, अशा शिक्षणसंस्थांमध्ये अमाप दडपशाहीने विद्यार्थ्यांचा आवाज बंद केला जातो आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात विद्यार्थ्यांनी निवडलेल्या युनियनच्या चारही पदाधिकाऱ्यांना काढून टाकण्याचं राजकारण करून विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांची या व्यवस्थेकडून असलेली आशाच एकप्रकारे मोडून काढली.

विचारधारेची बैठक असलेले, काही एक सामाजिक- राजकीय कार्यक्रम, धोरणं असलेले विद्यार्थी आणि तरुणांचे मंच राजसत्तेच्या निशाण्यावर असताना ‘कॉक्रोच जनता पार्टी’सारखा वर वर ‘अराजकीय’ वाटणारा मंच अचानक लोकप्रिय होतो, हे आपण समजू शकतो. अर्थात, आजच्या मोजक्या मागण्यांपलीकडे जाऊन या गटाला आपलं व्यापक राजकारण काय हे येणाऱ्या दिवसांत मांडावं लागेल, नाहीतर सोशल मीडियावर काही वेळासाठी लोकप्रिय होणारे अनेक लोक, मंच आणि ट्रेंड आपण पाहात असतोच. देशातल्या विद्यार्थ्यांच्या आणि तरुणांच्या व्यापक लढ्यांना जोडून घेण्यात, त्यातून शिकत पुढे जाण्यात त्यांना किती यश मिळतं, हे येणाऱ्या काळात दिसेलच.

## संस्कृत सुभाषित

आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः।

अर्थ – सेवन केले जाणारे अन्न सात्त्विक व शुद्ध असेल तर अंत:करणही निर्मल व शुद्ध होत असते.

## गुरु वचन

### जर मनच अशुद्ध तर...

खूप जुनी गोष्ट आहे. एकदा संत कबीर बसले होते. त्यांच्याकडे एक व्यापारी धावत आला. त्याने कबीरांना विनंती केली, ’मला तुम्हाला माझा गुरू करायचे आहे, तुम्ही मला गुरुमंत्र द्या’ तेव्हा संत कबीरांनी त्याला पैसे दिले आणि सांगितले आधी तू पटकन जाऊन दूध घेऊन ये, मग मी तुला गुरुमंत्र देतो.

त्या व्यापाऱ्याला खूप घाई होती. तो तडक धावत गेला आणि त्याने दूध कबीरांना आणून दिले. कबीरांनी त्याला एक भांडे दिले आणि सांगितले, हे दूध या भांड्यात ओत. त्याने ते भांडे घेतले, त्यात प्रचंड घाण साचली होती. त्या व्यापाऱ्याने कबीरांना ही बाब सांगितली. ते म्हणाले, बघ जर तू या खराब भांड्यात दूध टाकायला तयार नाहीस तर, मग मी तुझ्या अशुद्ध मनात राम नावाचा मंत्र कसा देऊ? ’

कबीरांनी म्हटलेले वाक्य किती खरे आहे बघा? जर तुमचे मनच शुद्ध नाही तर तुम्ही देवाचे दर्शन घेतले काय, किंवा संत सानिध्यात राहिलात काय, त्याचा काय परिणाम होणार?

संतांनीही हेच सांगितले आहे. भलेही तुम्ही पुजा नका करू, परंतु तुम्ही तुमचे आचरण, आणि मन शुद्ध ठेवा. आपण इतरांना एखाद्या कामासाठी दोष देत असतो, पण त्याची त्यामागची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. आणि आपण नेमके या उलटच करतो.

आपल्या दैनंदिन कामात आपण अनेकांना भेटत असतो, यात प्रत्येक व्यक्ती आपल्याला चांगलीच भेटते असे नाही, तर प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असून शकतो. त्यांच्या स्वभावानुसार त्यांना काम देणे गरजेचे आहे.

बदलायची असतील तर त्यांची मने बदलण्याचा प्रयत्न तुम्ही करा. त्यांच्या मनातील कटुता कमी करा. कारण कबीरांनी म्हटल्याप्रमाणे, खराब भांड्यात ज्या प्रमाणे तुम्ही दूध नाही टाकणार त्या प्रमाणेच एखाद्याचे मन परिवर्तन झाल्याशिवाय तुम्ही त्याला बदलू नाही शकणार.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ९७४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 6 | | | | | | |
| 7 | | | | 2 | | 1 | | 5 |
| 3 | 2 | | | | 1 | | 7 | |
| 4 | | | | | 2 | | 8 | |
| 6 | 5 | | | 4 | | | 3 | 7 |
| | 3 | | 5 | | | | | 4 |
| | 6 | | 1 | | | | 5 | 3 |
| 8 | | 5 | | 3 | | | | 9 |
| | | | | | | 8 | 6 | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९७३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 7 | 3 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | 8 |
| 9 | 2 | 8 | 4 | 7 | 5 | 3 | 6 | 1 |
| 5 | 4 | 6 | 3 | 1 | 8 | 7 | 2 | 9 |
| 8 | 9 | 1 | 2 | 6 | 7 | 5 | 4 | 3 |
| 7 | 6 | 4 | 5 | 3 | 9 | 8 | 1 | 2 |
| 3 | 5 | 2 | 8 | 4 | 1 | 6 | 9 | 7 |
| 2 | 3 | 9 | 6 | 8 | 4 | 1 | 7 | 5 |
| 4 | 8 | 7 | 1 | 5 | 2 | 9 | 3 | 6 |
| 6 | 1 | 5 | 7 | 9 | 3 | 2 | 8 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ००६८ – रोमन सम्राट नीरोने आत्महत्या केली.
- १७३२ – जेम्स ओगलथॉर्पला अमेरिकेत जॉर्जिया येथे वसाहत करण्याची मुभा मिळाली.
- १८५६ – ५०० मॉर्मोन पंथीयांनी पंथीयांनी आपला धर्म अनिर्बंध पाळण्यासाठी आयोवा सिटी, आयोवा येथूनसॉल्ट लेक सिटीकरता प्रस्थान केले.
- १८६३ – अमेरिकन गृहयुद्ध – ब्रॅन्डी स्टेशनची लढाई.
- १९२३ – बल्गेरियात लश्करी उठाव.
- १९३४ – डोनाल्ड डकचे चित्रपटसृष्टीत चित्रपट द वाइज लिटल हेन या चित्रपटाद्वारे पदार्पण.

### राष्ट्रीय

- १९६४ – लालबहादूर शास्त्री यांनी भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.
- १९८९ – भारताचा रोहिणी उपग्रह अवकाशात जळून नाहीसा झाला.

### जन्म

- १५९५ – व्लादिस्लॉस चौथा, पोलंडचा राजाचा जन्म.
- १६४० – लिओपोल्ड पहिला, पवित्र रोमन सम्राटचा जन्म.
- १६६१ – फियोदोर तिसरा, रशियाचा झारचा जन्म.
- १६७२ – पीटर पहिला, रशियाचा झारचा जन्म.
- १९४७ – किरण बेदी, भारतातील सर्वप्रथम स्त्री आय.पी.एस. अधिकारीचा जन्म.

### निधन

- ६२ – क्लॉडिया ऑक्टाव्हिया, रोमन सम्राट नीरोची पत्नीचे निधन.
- ६८ – नीरो, रोमन सम्राटचे निधन.
- ६३० – शहर्बराझ, पर्शियाचा राजाचे निधन.
- १७१६ – बंदा बहादुर, शीख सेनापतीचे निधन.

## उपदेशकथा

### कष्टाची बरी भाजी–भाकरी

प्राचीन अरबस्थानात हातिम बिन ताई नावाचा धनिक, कनवाळू, दानशूर आणि परम नीतिमंत म्हणून प्रसिद्ध होता. हातिमताई या नावानेच तो ओळखला जातो. एकदा एका मित्राने म्हटले, ‘मला तर अलम दुनियेत तुझ्या तोडीची श्रेष्ठ व्यक्ती दुजी असेल, असं वाटत नाही. तुला तरी असा कुणी भेटला होत का,जो तुला तुझ्याहून श्रेष्ठ वाटला?’

हातिमताईंनी म्हटले,‘एकदा मी पवित्र पर्वणीच्या दिवशी अन्नछत्र उघडलं. चाळीस उंट दान केले. कुणाही अतिथीला मुक्तद्वार होतं. माझे आप्तेष्ट नगरीत हिंडून हाकारा–डांगोरा पिटत होते. मी स्वत:सुद्धा भुकेलेल्यांच्या शोधासाठी बाहेर पडलो. वेशीबाहेर मला एक लाकूडतोड्या भेटला. ताज्या छाटलेल्या काटक्यांची मोळी त्याच्या माथ्यावर होती. मी त्याला म्हटलं, भाई हातिमताईच्या अन्नछत्रात जाऊन तू यथेच्छ भोजन का करत नाहीस?’

त्यानं उत्तर दिलं, ‘निढळाचा घाम गाळून जो आपली भाकरी कमावू शकतो, त्याला हातिमताईच्या औदार्यानं ओशाळं व्हायची जरुरीच काय? ‘मी यावर निरुत्तर झालो. तो लाकूडतोड्या नक्कीच माझ्याहून वरचढ होता.

कथा उपदेश : आशाळभूत होण्यापेक्षा, लाचारी पत्करण्यापेक्षा स्वश्रमाने मिळालेली भाकरी पंचपक्वान्नांहून स्वादिष्ट असते. मनुजाने स्वत्वावर तिलांजली देऊ नये. पृथ्वीचे राज्य त्याचेच आहे!

## : SMS :

Wife Saw Sign Board:
Nylon Saree Rs.8/-
Cotton Saree Rs.5/-
Banarsi Saree Rs.10/-
Wife: Give me Rs.500 I'll buy 50 Sarees.
Husband: Andhi! Dhobi ki dukaan hai.

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर परगावी जाण्याचे बेत व खाण्या–पिण्याची विविधता यामुळे वेळापत्रक बिघडणे शक्य.

**वृषभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण देवापुढे मागितलेले मागणे प्रत्यक्षात मिळण्याच्या शक्यता चांगल्याच वाढतील.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम यशाच्या शिखराकडे होणारी वाटचाल आपापल्या क्षेत्रात प्रसिद्धी देणारी ठरेल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण कुटुंबात कलह, आजारपण, किरकोळ अपघात इ.मुळे त्रासदायक प्रसंग येणे शक्य.

**सिंह :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण कामाच्या ठिकाणी आपल्याला न आवडणारे काम मिळाल्यामुळे कामातील उत्साह कमी होईल.

**कन्या :** शुभ रंग: निळा,शुभ दिशा: दक्षिण शक्यतो ज्या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे असे निर्णय शक्यतो पुढे ढकला.

**तुळ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर एखादा मोठा खर्च अनाठायी ठरणार नाही याची काळजी घ्या.

**वृश्चिक :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व मोठेपणाच्या नावाखाली होणारा खर्च अवाक्याबाहेर जाणार नाही याची काळजी घ्या. मुलांकडे दुर्लक्ष नको.

**धनु :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पूर्व महत्त्वाचे निर्णय, बैठका शक्यतो पुढे ढकला. सिनेमा, नाटक पहाण्याचा बेत आखाल.

**मकर :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व विशेष आदर दाखवून केलेले हट्ट त्या त्या व्यक्तीकडून पुरविले जातील. कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न सुटेल.

**कुंभ :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पश्चिम अनुभवी व्यक्तीबरोबर होणारी उठबस आपल्या ज्ञानात भर टाकेल.

**मीन :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पूर्व कोणताही खर्च करताना ‘अंथरूण पांघरून पाहून पाय पसरावे’ हा सल्ला दिलेला महत्त्वाचा ठरेल.


## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:नवमी २६:३५:०२+ |
| ९ जून २०२६ | नक्षत्र:पूर्वाभाद्रपद |
| मंगळवार | ०९:३९:१७ |
| विक्रम संवत्– २०८२ | योग:प्रीति ०८:१७:५६ |
| अधिक ज्येष्ठशके | करण:तैतिल १५:०५:३६ |
| संवत्– १९४८ | करण:गर २६:३५:०२+ |
| संवत्सर –पराभवनाम | सूर्य:वृषभ |
| अयन– उत्तरायणारंभ | चन्द्र:मीन०३:३६:१६ |
| मास–अधिक ज्येष्ठ | हिजरी सन् – १४४७ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | मुस्लिम मास – जिल्हेज |
| कृष्ण पक्ष | तारीख – २३ |

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.५ | २५.८ |
| अहमदनगर | ३८.२ | २५.१ |
| अकोला | ४४.१ | ३२.४ |
| अमरावती | ४४ | ३२.२ |
| बीड | ४५.३ | ३४.२ |
| भंडारा | ४४.३ | ३२.७ |
| बुलढाणा | ४१.९ | २७ |
| चंद्रपूर | ४३.९ | ३५.५ |
| चेन्नई | ४२.६ | ३२.६ |
| नवी दिल्ली | ४२.६ | ३२.७ |
| धुळे | ४३.७ | २७.४ |
| गोंदिया | ४२ | ३१ |
| जळगाव | ४४.१ | ३१.२ |
| कोल्हापूर | ३४.७ | २५ |
| लातूर | ३८.४ | २६.३ |
| मुंबई | ४३ | ३६.९ |
| नागपूर | ४३.३ | ३२.९ |
| नांदेड | ४३.५ | ३०.४ |
| नंदूरबार | ४० | २६.३ |
| नाशिक | ३८.२ | २५.७ |
| पुणे | ३५.८ | २४.४ |
| पंढरपूर | ४०.५ | २७ |
| सातारा | ३७.७ | २५.२ |
| सांगली | ३७.९ | २५.३ |
| सोलापूर | ३९.९ | २७.३ |
| वर्धा | ४४.७ | ३३ |

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९७४



**आडवे शब्द**

१. अत्यंत श्रीमंत मनुष्याची ही व्याख्या आता कालबाह्य
८. पूर्ण भरतीची वेळ
१०. व्याकूळ
१३. संगोपन
१५. अडत्या
१६. पाठोपाठ
१८. कर्ण
१९. जखमेची खूण
२०. नूतन
२१. लोकसंख्येची मोजणी
२३. कमळ
२५. श्वसनेंद्रिय
२६. पडणे, ऱ्हास
२८. अंगरखा
२९. अबलाच्या विरुद्ध
३१. वरवधू
३५. कालक्रमानुसार
३६. अंत:करण
३७. भाषा, उक्ती
३९. चाळीस शेर
४०. गाढव
४१. घुसळण
४२. राजाचे संबोधन
४५. तीव्र ऊन
४६. घरात शिरण्याचा मार्ग
४८. अत्यंत तलम कापड
४९. कट्टा, चबुतरा
५०. अभिप्राय
५१. लक्ष्मीचे एक नाव
५३. मरुत, वारा
५५. निकट
५७. भाजीला न चालणारा अळू
५८. समुद्रकिनारा
६०. माफी
६१. रात्रभर
६४. विदेशी दारूचा प्रकार
६५. डाक, टपाल
६६. रात्र
६७. शेवट, अखेर
६८. जुगार
६९. मौल्यावान रत्ने–जड ----
७१. शरम
७२. सांघिक व्यायाम
७३. ’बालिका वधू’मुळे सर्वपरिचित झालेले चॅनेल
७४. याच्याप्रमाणे पाठ फिरवणारा संधीसाधू ठरतो
७६. आदरातिथ्य
७८. अरण्य
८०. मैदा
८१. सामन्यातील पराक्रमी
८२. मोठी वाटी
८३. झाकोळ

**उभे शब्द**

१. दरिद्री मनुष्य
२. कोकिळ (हिंदी)
३. नारदमुनींच्या तोंडी असणारा अष्टाक्षरी मंत्र
७. नवरा
८. अखंड
९. गर्वाने ही ताठ होते
१०. आजच्या आधीचा दिवस
११. लहान
१२. सारखा
१३. तिबेटी धर्मगुरु
१४. पवित्र, शुद्ध
१७. महाराष्ट्राचा छोटा शेजारी
१८. ’आ’काराची रेघ
२१. जन्ममृत्यू
२२. केसात माळायची फ ु लांची माळ
२४. कापड, वस्त्र
२६. पळस (संस्कृत)
२७. मोदकाचे आच्छादन
२९. सवय, राबता, उत्तर
३०. खादाड राक्षस
३२. अरण्य
३३. अल्लड
३४. पक्के आश्वासन
३८. कॉफीप्रमाणे हल्ली हा थंडही पितात
३९. टप्प्याटप्प्याने प्रवास
४०. एक मोठे फळ
४१. गणपतीचे एक नाव, त्याला याच नावाच्या वृक्षची पत्रीही प्रिय
४२. गोड
४३. कौसल्यापुत्र
४४. मूकपटानंतरचा सिनेमा
४७. अगदी थोडी (शक्यता)
४९. हालचालीवरील नजर
५०. गाण्यातील ’मला’
५२. बाराव्या राशीचा प्राणी
५४. चांदणी
५६. वरवधूची मिरवणूक
५७. लोणचे मुरल्यावर मिळणारा मगज
५९. मगज
६२. लाकडाची उत्कृष्ट जात
६३. आजूबाजूला
६५. मान्यतापत्र
६६. यकृताच्या आकाराचे कडधान्य
६७. अंतरिक्ष
७०. परंपरेने मिळालेले
७२. अलमारी
७३. कारस्थान
७५. गुलजार यांच्या कथांमध्ये आढळणारी पंजाबमधील नदी
७७. धमनी
७९. आकाश

**जम्बो शब्दकोडे क्र. ९७३ चे उत्तर**

आडवे उत्तर १. लोकसभा ५.कोजागरी ७.रात ९.बजरंगबली ११.घुबड १२.मज १४.कागद १५.तपासनीस १७.तपास १९.वणी २०.मद २२.अवकाशयान २५.हटवादी २९.ताल ३०.फेरी ३१.खार ३२.खवखवे ३३.वाचक ३४.दैना ३५.मका ३६.रूक्ष ३८.शिव ४०.पांग ४१.महालय ४२.तीज ४४.जालीम ४५.आद्य ४७.मदत ४९.रेडा ५१.पीत ५३.प्रणव ५४.खास ५५.होकार ५७.सारमेय ५९.चणचण ६१.हद्द ६२.सह ६३.चुट्टा ६५.हास्य ६६.ऊद ६७.होरा ६८.पत्रकार

उभे उत्तर : १.लोकमत २.सब ३.भाजका ४.अंगद ५.कोलीत ६.गवसणी ७.राब ८.तडफ १०.रंगदेवता ११.घुसमट १३.जपान १६.पावन १८.पाश २१.दवाखाना २३.कालवाकालव २४.यात्रेकरू २५.हरी २६.दीर २७.उखळ पांढरे होणे २८.नखरा ३०. फेटा ३४.दैवजात ३५.महा ३७.क्षती ३९.हमखास ४१.मद्यपी ४३.जम ४६.प्रणय ४८.दळण ५०.डाका ५२.तसा ५३.प्रमेह ५४.खाण ५६.रहस्य ५८.रसद ५९.चट्टा ६०.चरित्र ६३.चुरा ६४.घोर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### हर घर योद्धा स्वसंरक्षण शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद; 244 जणांचा सहभाग

पुणे (दैनिक संध्या) : युवक आणि युवतींनी स्वसंरक्षणाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम व्हावे, या उद्देशाने हिंदु जनजागृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय 'हर घर योद्धा' स्वसंरक्षण शिबिरांना पुणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १९ एप्रिलपासून सुरू झालेल्या या अभियानांतर्गत नायगाव, पेठ, लोणी काळभोर, कोलवडी, थेऊर, पांडवदंड, दहिटणे, शिरवळ, भोर, तळेगाव दाभाडे आणि राजगुरूनगर येथे शिबिरे पार पडली. या शिबिरांमध्ये एकूण २४४ युवक व युवतींनी सहभाग घेतला. त्यापैकी १४४ जणांनी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याने त्यांना प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांसह मानसिक सक्षमीकरण, प्रसंगावधान आणि संकटसमयी योग्य निर्णय घेण्याचे प्रशिक्षण शिबिरात देण्यात आले. प्रशिक्षण घेतलेल्या सहभागींकडूनही सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. कु. श्रावणी माळवे यांनी, "या शिबिरामुळे आत्मविश्वास वाढला असून कोणत्याही संकटाला धैर्याने सामोरे जाण्याची तयारी झाली", असे सांगितले. तर नायगाव येथील सौ. सुप्रिया चौधरी यांनी, "अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची मानसिकता आणि मनाने अधिक कणखर होण्याची प्रेरणा या शिबिरातून मिळाली", असे मत व्यक्त केले. शिबिरांच्या यशस्वितेमागे स्थानिक स्वयंसेवक आणि ग्रामस्थांचेही मोठे योगदान राहिले. कोलवडी येथील युवकांनी शिबिराचा प्रसार करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. थेऊर येथे ग्रामस्थांनी घरोघरी जाऊन जनजागृती करत शिबिराच्या आयोजनात सक्रिय सहभाग नोंदवला. शिरवळ येथे मे महिन्याच्या कडक उन्हात दुपारच्या वेळेत शिबिर होत असूनही युवतींचा उत्साह कायम राहिला. स्थानिक शाळेच्या मुख्याध्यापिकांनीही शिबिरासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

### पुण्यात अवैध दारूविरोधात मोठी कारवाई; 116 जण अटकेत

पुणे (दैनिक संध्या) : फुगेवाडी आणि हडपसर येथे मिथेनॉलमिश्रित गावठी दारूच्या सेवनामुळे झालेल्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारूनिर्मिती आणि विक्रीविरोधात मोठी मोहीम हाती घेतली आहे. गेल्या सात दिवसांत विभागाने 142 गुन्हे दाखल करून 116 जणांना अटक केली असून, तब्बल 1 कोटी 47 लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे आणि विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अतुल कानडे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. 29 मे ते 4 जून या कालावधीत पुणे विभागात अवैध दारूविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत 8 हजार 472 लिटर तयार गावठी दारू जप्त करण्यात आली. तसेच गावठी दारूनिर्मितीसाठी वापरण्यात येणारे 69 हजार 271 लिटर रसायन जागीच नष्ट करण्यात आले. याशिवाय 11 हजार 733 लिटर परराज्यातील व बनावट मद्य जप्त करण्यात आले. अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली 11 वाहनेही जप्त करण्यात आली आहेत. विषारी दारू प्रकरणानंतर अवैध दारूनिर्मितीची केंद्रे पूर्णपणे उद्ध्वस्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, हातभट्टी व्यवसायासाठी कच्चा माल पुरविणाऱ्यांनाही आरोपी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार सराईत गुन्हेगारांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्यासाठी 125 प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत.

### शालेय बस सुरक्षिततेसाठी आरटीओचे कठोर निर्देश; विशेष तपासणी मोहीम सुरू

पुणे (दैनिक संध्या) : नवीन शैक्षणिक वर्ष काही दिवसांतच सुरू होत आहे. शाळा सुरू होताच गजबजणाऱ्या शालेय बस आणि व्हॅनमधून विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी आरटीओ प्रशासन आता ॲक्शन मोडमध्ये आले आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या सर्व गाड्या फिट ठेवा, असे आदेश आरटीओने जिल्ह्यातील सर्व शाळा व्यवस्थापन आणि शिक्षण विभागाला पत्राद्वारे दिले आहेत. शाळा प्रशासनाने प्रत्येक शाळेत शालेय परिवहन समिती स्थापन करून नियमांचे ऑडिट करावे, अशा सूचनाही आरटीओने दिल्या आहेत. बेकायदेशीर आणि विनापरवाना चालणाऱ्या व्हॅन किंवा रिक्षांमध्ये आपल्या पाल्यांना पाठवू नका, असे आवाहन आरटीओने शाळांसोबतच पालकांनाही केले आहे. शाळा सुरू होताच आरटीओकडून शहरातील मुख्य चौकांमध्ये विशेष तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. आरटीओ प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शाळा सुरू होण्यापूर्वीच सर्व शालेय वाहनांचे फिटनेस (योग्यता प्रमाणपत्र) तपासून घेणे बंधनकारक आहे. गाड्यांची तांत्रिक स्थिती उत्तम असणे, ब्रेक, हेडलाईट, टायर सुस्थितीत असणे आणि वाहनांना स्पीड गव्हर्नर (वेग नियंत्रक) लावलेले असणे अत्यंत आवश्यक आहे.

# एका मिनिटात १०४५ वृक्षांचे रोपण

## पर्यावरण दिनानिमित्त क्रिसाला- हिरानंदांनी टाउनशिपचा हरित विक्रम

**पुणे (दै. संध्या)**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरी शाश्वततेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, क्रिसाला- हिरानंदांनी टाउनशिप ने, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल पुणे अर्बन फॉरेस्ट उपक्रमांतर्गत अवघ्या एका मिनिटात १०४५ वृक्षांची लागवड करून उल्लेखनीय विक्रम नोंदवला. पुण्यातील उत्तर हिंजवडी येथील आपल्या टाउनशिपमध्ये आयोजित या भव्य पर्यावरण मोहिमेत १००० हून अधिक नागरिक, धोरणकर्ते, उद्योग क्षेत्रातील नेते, प्रशासकीय अधिकारी, पर्यावरणप्रेमी, विकासक, कर्मचारी, चॅनेल भागीदार, ग्राहक आणि नागरिक सहभागी झाले. या उपक्रमातून शहरात अधिक हिरवेगार आणि निरोगी वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे केलेली वचनबद्धता दिसून आली.

या उपक्रमाला माननीय शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील, हिरानंदानी कम्युनिटीजचे अध्यक्ष डॉ. निरंजन हिरानंदानी, वरिष्ठ शासकीय अधिकारी, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल चे सदस्य, तसेच आघाडीचे रिअल इस्टेट विकासक भारत अग्रवाल,संस्थापक, कस्तुरी हाऊसिंग; बीजेवायएमचे राज्याध्यक्ष अनुप अविनाश मोरे, क्रिसाला डेव्हलपर्सचे संस्थापक ओमप्रकाश अग्रवाल; चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक सागर अगरवाल; व्यवस्थापकीय संचालक आकाश अगरवाल आणि संयुक्त व्यवस्थापकीय संचालक विशाल अगरवाल यांचा समावेश होता.



टाउनशिपचा पर्यावरणीय पाया अधिक मजबूत करणे आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने या वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. नव्याने लावलेली झाडे भविष्यात हरित क्षेत्र वाढविणे, स्थानिक जैवविविधता समृद्ध करणे, धुळीचे प्रमाण कमी करणे, शहरी उष्णतेमुळे पर्यावरणावर होणार परिणाम कमी करणे आणि नागरिकांसाठी अधिक आरोग्यदायी बाह्य वातावरण निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतील. टाउनशिपच्या विकासासोबत ही झाडे दीर्घकालीन पर्यावरणीय पायाभूत सुविधांचा महत्त्वपूर्ण भाग बनतील.

या उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे टेरी सोबतची क्रिसालाची भागीदारी. या सहकार्याद्वारे शाश्वततेसाठी वैज्ञानिक आणि मोजता येणारी कार्यपद्धती विकसित केली जात आहे. हरित क्षेत्राची घनता, कार्बन शोषण क्षमता, जैवविविधतेत होणारी वाढ, तापमानातील आरामदायीपणा आणि हवेच्या गुणवत्तेशी संबंधित विविध निर्देशकांचे कालांतराने निरीक्षण आणि मूल्यांकन केले जाणार आहे. यामुळे शाश्वततेशी संबंधित उपक्रम केवळ हेतूपुरते न राहता त्यांचे प्रत्यक्ष परिणाम मोजणे शक्य होईल.

यावेळी बोलताना क्रिसाला डेव्हलपर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सागर अगरवाल म्हणाले, "क्रिसाला मध्ये शाश्वतता ही केवळ एक संकल्पना नसून आमच्या प्रत्येक विकास प्रकल्पाचा मूलभूत आधार आहे. नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल पुणे अर्बन फॉरेस्ट उपक्रम हा अशा समुदायांच्या निर्मितीबाबतची आमची वचनबद्धता दर्शवतो, जिथे नागरिक निसर्गाशी जोडलेले राहून अधिक समृद्ध जीवन जगू शकतील. या यशस्वी वृक्षारोपण मोहिमेने उद्योग, शासन संस्था आणि नागरिक एकत्र आल्यास किती मोठे परिवर्तन घडवून आणता येते हे सिद्ध केले आहे. शहरी विकासासाठी शाश्वतता हा आता पर्याय नसून जबाबदारी बनली आहे. विकास आणि पर्यावरण संवर्धन यामध्ये संतुलन राखत दीर्घकालीन कल्याण साधणारे समुदाय निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." हा कार्यक्रम नागरिकांच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन देणारे एक प्रभावी व्यासपीठही ठरले. या उपक्रमाद्वारे क्रिसाला डेव्हलपर्स - हिरानंदांनी कम्युनिटीज यांनी केवळ घर नव्हे, तर माणूस आणि निसर्ग एकत्रितपणे भरभराट करू शकतील अशा शाश्वत आणि भविष्यासाठी सज्ज समुदायांच्या निर्मितीबाबतची आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली.

## फादर्स डे निमित्त वडिलांसाठी उपयुक्त, आकर्षक भेटवस्तूंचा खास संग्रह

**पुणे (दै. संध्या)**

वडिलांसाठी योग्य भेटवस्तू निवडणे अनेकदा आव्हानात्मक ठरते. ते सहसा स्वतःसाठी काही मागत नाहीत आणि आपल्या आवडीच्या वस्तूंनाच प्राधान्य देतात. अशा वेळी फॅशनशी संबंधित उपयुक्त भेटवस्तू हा विचारपूर्वक आणि उपयोगी पर्याय ठरू शकतो. याच पार्श्वभूमीवर नायका फॅशनने फादर्स डे निमित्त पुरुषांसाठी वस्त्रे, पादत्राणे आणि पूरक वस्तूंचा विशेष संग्रह सादर केला आहे.







काही वस्तू अशा असतात ज्या काळानुसार बदलणाऱ्या प्रवाहांपासून दूर राहून कायम लोकप्रिय ठरतात. उत्तम बसणारे शर्ट, पारंपरिक शैलीतील अर्धबाह्यांचे टी-शर्ट तसेच आरामदायी तागाच्या कापडातील वस्त्रे कोणत्याही व्यक्तीच्या कपाटात सहज स्थान मिळवतात. हलक्या कापडांचा वापर, आकर्षक रचना आणि विविध प्रसंगांना साजेसे रंग यामुळे हे पर्याय कौटुंबिक समारंभांपासून दैनंदिन वापरापर्यंत उपयुक्त ठरतात.

फादर्स डेचा आनंद अनेक कुटुंबांमध्ये दिवसभर साजरा केला जातो. त्यामुळे आराम आणि देखणेपणा यांचा समतोल साधणाऱ्या वस्तूंना विशेष महत्त्व असते. आरामदायी पादत्राणे, सहज परिधान करता येणारी वस्त्रे आणि दैनंदिन वापरातील आवश्यक वस्तू या शैली आणि सोयीचे उत्तम मिश्रण ठरतात. यंदाच्या हंगामात विविध प्रसंगांसाठी सहज वापरता येतील अशा वस्तूंना अधिक पसंती मिळत आहे. पूरक वस्तूंमध्ये आकर्षक मनगटी घड्याळ, दर्जेदार चामड्याचे पाकीट किंवा प्रवासासाठी उपयुक्त पिशवी यांसारखे पर्याय कायम लोकप्रिय राहिले आहेत. या वस्तू व्यक्तिमत्त्वाला उठाव देण्याबरोबरच दीर्घकाळ उपयोगातही राहतात. त्यामुळे भेटवस्तूमागील प्रेम आणि आपुलकीची भावना दीर्घकाळ जपली जाते.

यंदाच्या फादर्स डे निमित्त आपल्या वडिलांना किंवा पितृतुल्य व्यक्तींना अशा भेटवस्तू द्या, ज्या उपयुक्त, आकर्षक आणि कायम स्मरणात राहतील. नायका फॅशनचा फादर्स डे विशेष संग्रह अशाच विचारपूर्वक निवडलेल्या पर्यायांनी सजलेला आहे.

## तापणारे महासागरच मान्सूनसमोरील नवे आव्हान

**पुणे (दै. संध्या)**

महासागरात भरपूर पाणी असले तरी ग्लोबल वॉर्मिंगमुळे ते प्रचंड तापत आहेत. त्यांचे वाढते तापमान हेच भारतीय मान्सूनसमोरील नवे आव्हान ठरत आहे. गत चार वर्षांत अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर मिळून एकूण १८ चक्रीवादळे आली. त्यामुळे मानवासह निसर्गाला त्याची किंमत मोजावी लागली.

सोमवारी, ८ जून रोजी जागतिक महासागर दिन जगात सर्वत्र साजरा केला जाणार आहे. पृथ्वीच्या सुमारे ७१ टक्के पृष्ठभागावर महासागरांचे अस्तित्व असून ते जागतिक हवामान आणि जलचक्राचे प्रमुख नियंत्रक मानले जातात. भारतीय



मान्सूनवर विशेषतः अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागरातील समुद्रपृष्ठ तापत आहे. समुद्राचे तापमान सामान्यपेक्षा जास्त झाल्यास बाष्पीभवन वाढते आणि वातावरणात अधिक आर्द्रता निर्माण होते. त्यामुळे काही भागांत अतिवृष्टीची शक्यता वाढते. जागतिक महासागर दिनानिमित्त महासागरांचे संरक्षण हे केवळ पर्यावरणासाठीच नव्हे तर भारताच्या मान्सून, अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे.

## बीएनसीए संशोधन केंद्रातील पीएच. डी. विषय देशासमोरील आव्हांनासाठी उपयुक्त

**पुणे (दै. संध्या)**

महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनमधील (बीएनसीए) संशोधन विषय हे आपल्या देशासमोरील विविध आव्हानांना तोंड द्यायला नक्कीच उपयोगी ठरतील. तसेच संशोधन केंद्राने केलेल्या मार्गदर्शनानुसार तिथे पदवी घेतलेले २५ पीएच. डी. धारक हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दीष्टानुसार घडले आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे यांनी सांगितले. त्यांच्या उपस्थितीत २५ डॉक्टरेट मिळवलेल्यांच्या सारांश पुस्तकाचे प्रकाशन झाले.

२०१२ ते २०२५ या १३ वर्षांमध्ये बीएनसीए संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांनी २५ पीएच.डी. धारक घडवले. त्यांच्या उपस्थितीत हा स्नेहमेळावा बीएनसीएच्या आवारातील आयएसडीएस सभागृहात 'जागतिक पर्यावरण दिनी' नुकताच संपन्न झाला. या प्रकाशनप्रसंगी पीएच.डी. धारकांसह बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप, उपप्राचार्य डॉ. शार्वेय धोंगडे, ज्येष्ठ आर्किटेक्ट डॉ. गोपाळ कान्हेरे,संशोधन केंद्राचे मार्गदर्शक व समन्वयक डॉ. मीरा शिरोळकर, मार्गदर्शक डॉ. वसुधा गोखले, डॉ. अभिजित नातू, तसेच डॉ. पराग नारखेडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सर्व उपस्थित पीएच.डी. धारकांना व त्यांच्या मार्गदर्शकांना डॉ. लटपटे, डॉ. कश्यप आणि डॉ. कान्हेरे यांच्या हस्ते सत्कार करताना महर्षी कर्वे यांच्या प्रतिमा व रोपटे असणारी कुंडी भेट देण्यात आली.



डॉ. लटपटे पुढे म्हणाले की, देशापुढे आणि जगापुढे हवामानाचे गंभीर प्रश्न, वाढते शहरीकरण, भूराजकीय बदल आणि आर्टिफिशियल इंटेलीजन्ससारखे प्रश्न आ वासून उभे आहेत. ते प्रश्न सोडवण्यास यातील संशोधन विषय उपयोगी ठरतील. आर्किटेक्चर सारख्या तांत्रिक क्षेत्रातील डिझाईन आणि तंत्र यातील संशोधनाची वाढती गरज लक्षात घेता बीएनसीएच्या संशोधन केंद्राने केलेले हे कार्य अभिनंदनास पात्र आहे. विकसित भारतासाठी ते कार्य नक्कीच उपयोगी ठरेल.

आपल्या सगळ्यांसाठी हा अत्यंत आनंदाचा दिवस असल्याचे डॉ. कश्यप यानी यांनी सांगितले. ते म्हणाले की, हे सर्व पीएच.डी. धारक व त्यांचे मार्गदर्शक यांनी अत्यंत खडतर परिस्थितीतून हे संशोधन कार्य तडीस नेले आहे. संशोधन केंद्राची संकल्पना डॉ. कान्हेरे यांच्या पाठपुराव्यामुळेच प्रत्यक्षात येऊ शकली. पूर्ण झालेल्या सर्व पीएच.डी.चे विषय हे समाजाभिमूख असून ते भविष्यात कपाटबंद न राहता समाजापर्यंत पोहोचले पाहिजेत. यातील प्रत्येक पीएच.डी. धारकाने संशोधन मार्गदर्शक होऊन पुढच्या पिढ्यांचे उत्तरदायित्त्व निभावले पाहिजे.

डॉ. वसुधा गोखले म्हणाल्या की, कठोर अकादमिक शिस्तीमुळेच सर्व पीएचडी धारकांना कार्य पूर्णत्वास नेता आले. यातून आपल्याला खूप काही नवे शिकता आले.डॉ. अभिजित नातू यांनीही आपल्याला ऐतिहासिक वारसा जतन, शहर नियोजन यांसारखे नवे विषय दहा जणांना मार्गदर्शन करताना शिकता आले, असे सांगितले.

डॉ. मीरा शिरोळकर यांनी आपल्या प्रास्ताविकात आजवरच्या कारकिर्दीत ५० पीएच.डी.ची नोंदणी झाली असून पीएच. डी धारकांचे अर्धशतक पूर्ण करू, असा विश्वास व्यक्त केला. प्रा. महेश बांगड यांनी सूत्रसंचालन केले.

# दिवंगत पंतप्रधान लाल बहादूर 'शास्त्री पुतळ्याचे सुशोभीकरण, शासकीय नियमावली नुसार व्हावे'!

## पुतळा समिती निमंत्रक गोपाळदादा तिवारी ; 'शिवसेना - काँग्रेस' आंदोलनास यश

**पुणे (दै. संध्या)**

दिवंगत पंतप्रधान लाल बहादूर 'शास्त्री पुतळ्याचे सुशोभीकरण, शासकीय नियमावली नुसार व्हावे' खाजगी बिल्डर'च्या पसंतीने नव्हे अशी मागणी - पुतळा समिती निमंत्रक गोपाळदादा तिवारी यांनी मनपा प्रशासना सोबतच्या बैठकीत केली.

नवी पेठेतील '८० फूटी_शास्त्री रोड' वरील दिवंगत पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या पुतळा - परीसराचे खाजगी विकसाकडून 'आयलंड सुशोभीकरणाच्या' नावे तोड - फोड करण्यात आल्याचे स्थानिक शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आल्याने, त्यांनी हरकत घेऊन पुणे मनपा भवन समोर आंदोलन सुरु केले होते या आंदोलनाची दखल घेऊन पुणे मनपा प्रशासनाने चर्चे साठी मुख्य अभियंता कार्यालयात बैठकीस बोलवण्यात आले होते.

सदाशीव पेठेतील (मेघराज कार्यकर्त्यांना 'शास्त्री पुतळा - स्थापनेचा' इतिहास माहीत असल्याने, सदरची बाब त्यांनी शास्त्री पुतळ्याचे प्रवर्तक व पुतळा समितीचे निमंत्रक गोपाळदादा तिवारी यांचे निदर्शनास आणली असता, त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांनी 'वेगळे आंदोलन' न करता शिवसेने'च्या आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला व पुतळा समिती'चे वतीने पुणे मनपा आयुक्तांना लेखी हरकतीचे पत्र ही दीले. ३ दिवस चाललेल्या आंदोलनानंतर मनपा प्रशासना' च्या वतीने मुख्य अभियंता यांचे कार्यालयात झालेल्या बैठकीत पुतळा समितीचे निमंत्रक, माजी नगरसेवक गोपाळदादा तिवारी यांनी १२ मे १९८९ रोजी पुणे मनपा'स शास्त्री पुतळा भेट देतांनाची जुनी छाया चित्रे, वृत्तपत्रांची कात्रणे सादर केली.

राष्ट्रीय मानांकने ठरलेल्या राष्ट्रपुरुषांचे, "दिवंगत पंतप्रधानांची स्मारके व पुतळे हे शासकीय गँझेट व नियमावली नुसार सभोवतालची मोकळीजागा सोडून, कठडे इ बसवुन त्याचे अनावरण करण्यात येत असल्याचे गोपाळदादा तिवारी यांनी या वेळी संबंधितांच्या निदर्शनास आणले.

यावेळी मुख्य अभियंता श्री पावस्कर, उप अभियंता बिपीन शिंदे सह, शिवसेना प्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, गटनेते नितीन गावडे , प्रतिक आल्हाट, दत्ता घूले, अनंता घरत सह काँग्रेसचे सागर धाडवे, आशिश गुंजाळ, नंदकुमार पापळ, शशांक पाटील, करूणा घाडगे, मनिषा फाटे इ उपस्थित होते.




माझ्या "नारायण पेठ ते गांजवे चौक" या तत्कालीन जुन्या प्रभागातील, शास्त्री रोड वर भारतरत्न लाल बहादूर शास्त्रींचा पुतळा असावा याच भावनेने, या परिसरातील क्रिकेट क्लब, सामाजिक मंडळ व मित्र परिवार यांचे सहकाऱ्यातून आपल्याच पुढाकाराने घेऊदिवंगत पंतप्रधान, भारतरत्न लालबहादूर शास्त्रीजी यांचा पुतळा शिल्पकार बी आर खेडकर यांच्याकडून तयार करून तत्कालीन मावळते 'महापौर ॲड. अंकुशजी काकडे व होणारे महापौर बाळासाहेब राऊत' यांचे उपस्थिती'मध्ये, शुक्रवार दि १२ मे १९८९ रोजी पुणे महापालिकेचे महापौर कार्यालयात भेट दिल्याचे सांगीतले. शास्त्री रोड वरील मांगीर बाबा' चौक येथील 'गोलाकार आयलंड' मध्ये सदर शास्त्री पुतळ्याची स्थापना पुणे मनपा तर्फे शासकीय नियमावलीनुसार करण्यात येऊन तत्कालीन मुख्यमंत्री मा शरदचंद्रजी पवार साहेब यांचे हस्ते पुतळ्याचे अनावरण ही झाले.

विशेष म्हणजे स्व. लाल बहादूर शास्त्रीजी यांचे चिरंजीव श्री अनिलजी शास्त्री व कुटुंबीय, पुणे शहरात आले असता त्यांनी या स्मारकास भेट देऊन आम्हा कार्यकर्त्यांचे कौतुक ही केले व पुणे मनपा'स धन्यवाद ही दिले. असेही गोपाळदादा तिवारी यांनी यावेळी सांगितले.

सदर नुतनीकरणा बाबत पुतळा समिती इ ना कोणतीही कल्पना न देता.. वा नियोजीत प्रकल्प व नकाशे न दाखवता, तोड - फोडीचे काम सुरु केल्याचे

निदर्शनास येताच, भारतरत्न शास्त्रीजींचे प्रति राष्ट्र प्रेमाच्या कर्तव्यशील भुमिकेतून, स्थानिक (उबाठा) शिवसैनिकांनी हरकत घेऊन आंदोलन सुरु करून सदरची बाब लक्षात आणून दिल्या बद्दल गोपाळदादा तिवारी यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले व धन्यवाद ही दिले.

सदारचा पुतळा पुणे शहरातील मोठ्या संख्येने असलेल्या विद्यार्थी–स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी यांची वर्दळ असलेल्या भागात असून, देशाला अधिक सक्षम, स्वयंनिर्भर बनवणाऱ्या व देशास "जय जवान–जय किसान"चा नारा देणाऱ्या दिवंगत पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची सदैव प्रेरणा देत आला असल्याचे ही त्यांनी सांगीतले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### डिप्यू सिंथेस स्किल्स लॅबचे उद्घाटन

पुणे (दैनिक संध्या) : Saishree Vitalife Hospitals आणि DePuy Synthes यांनी ऑर्थोपेडिक सर्जनांचे प्रशिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी आणि रुग्णांच्या उपचार परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी समर्पित ऑर्थोपेडिक स्किल्स लॅब सुरू केली आहे. ही स्किल्स लॅब टियर-२ आणि टियर-३ भागांतील ऑर्थोपेडिक सर्जनांसाठी प्रशिक्षण केंद्र म्हणून कार्य करेल. येथे प्रगत जॉइंट रिप्लेसमेंट तंत्रांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाईल. या उपक्रमाचा भर सर्जिकल कौशल्ये अधिक सक्षम करणे, शस्त्रक्रियांमध्ये अचूकता आणि सातत्य वाढवणे तसेच रुग्णांच्या पुनर्वसन आणि उपचार परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणणे यावर आहे. सुश्री यू जिन चे म्हणाल्या "या उपक्रमाचा मुख्य उद्देश संरचित प्रशिक्षणाद्वारे सर्जनांची क्षमता विकसित करणे आणि विविध आरोग्यसेवा व्यवस्थांमध्ये रुग्णांना अधिक चांगले उपचार परिणाम मिळवून देणे हा आहे." डॉ. नीरज अडकर म्हणाले "हे प्रशिक्षण व्यासपीठ सर्जनांना आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास आणि अधिक कौशल्य व आत्मविश्वासासह रुग्णसेवा देण्यास मदत करेल."

### टोयोटा ने सादर केली नवी इनोव्हा क्रिस्टा



पुणे (दैनिक संध्या) : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी नवी इनोव्हा क्रिस्टा लॉन्च करण्याची घोषणा केली. नव्या बोल्ड डिझाइन एलिमेंट्स आणि अतिरिक्त सोयीसुविधांसह ही गाडी ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. टोयोटाची "एव्हर बेटर कार्स" फिलॉसफी आणि मजबूत कस्टमर-फर्स्ट अप्रोच यानुसार, हे नवीन अपग्रेड बदलत्या ग्राहक गरजा लक्षात घेऊन काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहे. त्यामुळे लाखो भारतीय कुटुंबांसाठी विश्वासार्ह मोबिलिटी पार्टनर म्हणून इनोव्हा क्रिस्टाचा वारसा अधिक मजबूत होणार आहे. दोन दशकांहून अधिक काळाच्या अपराजित आणि अद्वितीय प्रवासातून घडलेली इनोव्हा क्रिस्टा आजही भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी म्हणून ओळखली जाते. विश्वासार्हता, आराम, सुरक्षितता, लक्झरी आणि पॉवर यामुळे ती ग्राहकांची पहिली पसंती ठरली आहे. या मजबूत पायावर आधारित, नवी इनोव्हा क्रिस्टा टोयोटाच्या सतत सुधारणा करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. निवडक ग्रेड्समध्ये उपलब्ध अतिरिक्त फीचर्ससह, कार्यक्षमतेचे आणि सौंदर्याचे विचारपूर्वक केलेले संयोजन ग्राहकांना अधिक उंचावलेला ड्रायव्हिंग अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे.

### प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेच्या माध्यमातून तरुणांना संधी

पुणे (दैनिक संध्या) : केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना २०२६ च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून देशभरात ३१ हजार ४८० पेक्षा अधिक इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. या योजनेंतर्गत १८ ते २५ वर्षे वय, भारतीय नागरिकत्व असलेले, किमान १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा किंवा पदवीधर उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. पूर्णवेळ नोकरी किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र असतील. जे उमेदवार ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेत आहे ते उमेदवार पात्र आहेत. इंटर्नशिपचा कालावधी ६ ते ९ महिने असून दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार आहे. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेमध्ये पुणे जिल्ह्यामधील ज्युबिलंट फूडवर्क्स लि. (१९२), बजाज ऑटो लि. (३०९), भारत फोर्ज (७), रिलायन्स इंडिस्ट्रीज लि. (३३), टेक महिंद्रा (४२), स्कोडा ऑटो व्होल्क्सवॅगन इंडिया प्रा. लि. (१९), इमामी लि. (१५), फिनोलेक्स केबल्स लि. (६०), कॉग्नीझंट टेक्कॉलॉजी सोल्युशन्स इं. प्रा. लि. (१४), पिरामल फार्मा लि. (१) आदी नामांकित कंपन्यांमध्ये रिक्तपदांसाठी उमेदवारांना इंटर्नशिप करण्याची संधी उपलब्ध आहे. तरी या कंपनीमध्ये अर्ज करण्यासाठी मर्यादित कालावधी असल्यामुळे https://pminternship.mca.gov.in या पोर्टलवर जाऊन नोंदणी करावी व या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ पुणे या कार्यालयास प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र. ०२०-२६,१३३६०६, वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी सुरक्षागृहाची सुविधा उपलब्ध

पुणे (दैनिक संध्या) : आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी सुरक्षा देण्याच्या अनुषंगाने सुरक्षागृह शासकीय विश्रामगृह (जुने), २९ क्वीन्स गार्डन, ता. हवेली, जि. पुणे येथे स्थापन करण्यात आले आहे. सुरक्षेची आवश्यकता असलेल्या जोडप्यांनी सुरक्षागृह सुविधेचा लाभ घेण्याबाबत अर्ज करण्यासाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी डॉ. राधाकिसन देवढे यांनी केले आहे.



### अनुकरणीय गणेशोत्सवासाठी समाजोपयोगी उपक्रमांची गरज : मंदार लवाटे

पुणे (दैनिक संध्या) : गणेशोत्सव ही केवळ धार्मिक परंपरा नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. पेशव्यांच्या काळापासून ते विविध समाजघटकांपर्यंत गणेशोत्सव साजरा होत आला आहे. प्लेगची साथ असो वा पानशेत धरण फुटीचे संकट, गणेशोत्सव कधीच थांबला नाही आणि भविष्यातही त्यात खंड पडणार नाही. अनुकरणीय गणेशोत्सवासाठी समाजोपयोगी उपक्रमांची गरज असते असे प्रतिपादन इतिहासकार, लेखक आणि संशोधक मंदार लवाटे यांनी केले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या पर्यावरण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'रोटरी माय सिटी माय प्रॉमिस' या शिस्त व पर्यावरणपूरक वर्तन बदल अभियानाच्या तसेच जय गणेश व्यासपीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अनुकरणीय गणेशोत्सव २०२६ – मार्गदर्शन शिबिर' मध्ये ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. मिलिंद भोई, संगणकतज्ज्ञ व लेखक डॉ. दीपक शिकारपूर, चंद्रशेखर भेडा, मनोज धारप, शैलेन्द्र गाडेकर, विष्णू भेडा, पियुष शाह आदी मान्यवर उपस्थित होते.

# महावितरण अधिकाऱ्यांना भारतीय जनता पार्टीच्यावतीने निवेदन

## इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील अन्यायकारक भारनियमन तात्काळ बंद करा : प्रविण माने

भिगवण (दै. संध्या) :

इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या वारंवार व दीर्घकाळाच्या भारनियमनामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय जनता पार्टी, इंदापूर तालुक्याच्या वतीने महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन सुरू असलेले भारनियमन तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली.

सध्या उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे ग्रामीण भागात पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. अशा परिस्थितीत शेतीसाठी आवश्यक असलेले सिंचन, विहिरी, बोअरवेल तसेच विविध विद्युत पंपांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. मात्र सततच्या भारनियमनामुळे शेतकऱ्यांना पिकांना वेळेत पाणी देणे अशक्य होत असून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी उभ्या पिकांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.

ग्रामीण भागातील लघु व मध्यम व्यावसायिकांनाही या भारनियमनाचा मोठा फटका बसत आहे. वीज नसल्यामुळे अनेक उद्योगधंदे व व्यावसायिक आस्थापना वेळेवर सुरू राहू शकत नाहीत. परिणामी आर्थिक नुकसान होत असून ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे.

विद्यार्थ्यांनाही या समस्येचा गंभीर फटका बसत आहे. परीक्षांचा कालावधी सुरू असताना वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होत आहेत. डिजिटल शिक्षण, ऑनलाइन अभ्यास व इतर शैक्षणिक उपक्रमांवरही याचा विपरीत परिणाम होत आहे. यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.



तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. पिण्याच्या पाण्याच्या योजना, आरोग्य सेवा, लहान उद्योग तसेच घरगुती कामांवरही या भारनियमनाचा परिणाम होत आहे. नागरिकांच्या मूलभूत गरजांवर परिणाम होत असल्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने महावितरण प्रशासनाला इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागात सुरू असलेले भारनियमन तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली. तसेच शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना अखंडित व सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी त्वरित उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी निवेदनाची दखल घेत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. इंदापूर तालुक्यातील जनतेच्या प्रश्नांसाठी भारतीय जनता पार्टी सातत्याने पाठपुरावा करीत राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

> वादळामुळे अनेक ठिकाणी विजवाहिण्या व विज खांब पडलेले आहेत त्याची तात्काळ दुरुस्ती करून विज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.
> - प्रविण माने, भाजपा नेते

यावेळी मारुती वणवे, तेजस देवकाते, बाळासाहेब पानसरे, यशवंत कचरे, शुभम शिंगाडे, मिलिंद शिंदे, पोपट शिंदे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी ग्रामीण भागातील सुरू असलेल्या भारनियमनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली.

## झोपडपट्टी सुरक्षा दलाचा ३१वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

पुणे (दै. संध्या) :

सामाजिक न्याय, गायरान जमीनवर शासकीय निमशासकीय वसलेले अतिक्रमणे नियमानुकूल खाजगी जागेवर झोपडपट्टीधारकांचे हक्क कामगार व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या झोपडपट्टी सुरक्षा दल या संघटनेचा 31 वा वर्धापन दिन पुण्यात हडपसर ससाणे नगर येथील म्हाडा कॉलनीत शाखा कार्यालयाचे उद्घाटन करून उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात महापुरुषांच्या प्रतिमेस संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच शाखा कार्यालयाचे



उद्घाटन पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर निलेश मगर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भगवानराव वैराट यांनी आपल्या भाषणात म्हणाले गेली 31 वर्ष सातत्याने मोर्चा, आंदोलने, धरणे करून झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन, घरकुल, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, श्रमजीवी कामगारांचे प्रश्न व हक्क आणि महिलांवर होणारे अत्याचार विरोधात तसेच बेरोजगारी दलित अत्याचार महागाई शेतकरी बांधवांचे प्रश्न खाजगी सावकारी कंपन्या विरोधात लढा पुकारून जनकल्याणासाठी संघटना सातत्याने आक्रमकपणे जनतेच्या प्रश्नासाठी लढा उभारण्याचा निर्धार केला. यावेळी नगरसेवक खंडू लोंढे, प्रा. आसमा शेख, इम्तियाज मोमीन, हरिभाऊ वाघमारे, काशिनाथ गायकवाड, मोहंमद शेख, दत्ता डाडर, सुरेखा भालेराव, गणेश लांडगे, वंदना पवार, बाळासाहेब सुपेकर, दिना शेखर, संजय बंडे, शिवाजी भिसे, प्रवीण सपकाळ, अभिजीत ननावरे, चंद्रकांत कांबळे, श्याम सोनवणे, वैशाली अवघडे, पल्लवी कंदकल, दीपक आटोळे, गणेश गायकवाड, नितीन बोराडे, इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमात उत्कृष्ट सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकरची प्रतिमा आणि संविधानाची प्रत वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार संघटनेचे राज्य सरचिटणीस काशिनाथ गायकवाड यांनी मानले.

## ९ जूनपासून ५ सप्टेंबरपर्यंत भिडे पूल वाहतुकीसाठी बंद

पुणे (दै. संध्या) :

- डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकाला पेठांशी जोडणाऱ्या पादचारी पुलाचे काम सुरू
- पर्यायी मार्ग वापरण्याचे आवाहन

पादचारी पुलाच्या कामामुळे आणि पोलिसांच्या वाहतूक शाखेचे ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्यानुसार, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भिडे पूल मंगळवार , ९ जून रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते ५ सप्टेंबर २०२६ पर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. अशी माहिती पुणे मेट्रो च्या वतीने देण्यात आली. मात्र नदीपात्रातील रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे खुला राहणार आहे. भिडे पूल बंद असताना नागरिकांनी लकडी पूल, बालगंधर्व पूल आणि झेड ब्रिज या पुलांचा वापर करावा, असे आवाहन पुणे मेट्रोने केले आहे. वनाझ ते रामवाडी या मार्गावरील छत्रपती संभाजी उद्यान आणि डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकांना पुण्याच्या मध्यवर्ती पेठ भागाशी जोडण्यासाठी पुणे मेट्रोतर्फे पादचारी पूल बांधण्यात येत आहेत. यापैकी छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानकाला पेठ भागाशी जोडणारा पादचारी पूल मेट्रो प्रवासी आणि नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे.

## अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत समर्थ पॅनेलचा विजय

पुणे (दै. संध्या) :

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीची मतमोजणी पूर्ण झाली असून, या निवडणुकीत मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनेलने एकहाती विजय मिळवत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

पॅनेलमधील सर्व उमेदवार विजयी झाल्याने चित्रपट क्षेत्रातील सदस्यांनी समर्थ पॅनेलच्या नेतृत्वावर आणि कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केल्याचे स्पष्ट झाले आहे.

महामंडळाच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. त्यापैकी ३ जागा बिनविरोध निवडून आल्याने उर्वरित १४ जागांसाठी मतदान घेण्यात आले. या १४ जागांवर समर्थ पॅनेलने सर्व जागा जिंकत दणदणीत विजयाची नोंद केली.

## कीटकजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत कार्यशाळा संपन्न

बारामती (दै. संध्या) :

आरोग्य विभागाच्यावतीने पावसाळ्यातील उद्भवणारे कीटकजन्य आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या हिवताप उपपथक कार्यालय, प्रशासकीय भवन येथे नुकतीच कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी तालुक्यातील आरोग्य सेवक, आरोग्य निरीक्षक, प्रयोग शाळा वैज्ञानिक अधिकारी उपस्थित होते. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोज खोमणे म्हणाले,



पावसाळ्यात डेंग्यू, चिकणगुनिया अशा कीटकजन्य आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून यावर्षीही किटकशास्त्रीय सर्वेक्षण करुन घ्यावे. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी यांना संशयित रुग्णाचे रक्तजल नमुना वेळेत तपासणी करण्यासोबत कर्मचाऱ्यांशी समन्वय ठेवावे. आपल्या भागातील ग्रामपंचायत पदाधिकारी व परिसरातील शाळेत देखील जनजागृती करावी. जुलै महिन्यात पालखी सोहळा असल्याने आतापासूनच परिसरातील विहीर, हातपंप शुद्धीकरण करण्याची मोहिम हाती घ्यावी, असे डॉ. खोमणे यांनी सूचना दिल्या. आरोग्य पर्यवेक्षक सुप्रिया सावरकर यांनी नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षणाबाबत माहिती दिली. तसेच संदिप बालगुडे व गणेश घोरपडे यांनी डेंग्युरुग्णांचा शोध व गप्पी मासे तसेच हिम्मत कौले व गणेश जाधव यांनी 'हसत खेळत डेंग्यूवर पाळत' आणि बी. एस. एस. उपाध्ये यांनी आयुर्वेदिक वनस्पतीव्दारे डास नियंत्रणाबाबत मार्गदर्शन केले.

## किशोर मासाळ यांच्या वक्तव्याविरोधात नगरसेवक पदाच्या राजीनाम्याची मागणी

### नगरसेवकांचे सह्याचे निवेदन सादर

बारामती (दै. संध्या) :

बारामती नगर परिषदेचे नगरसेवक किशोर मासाळ यांनी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते अजितदादा पवार यांच्याविषयी केलेल्या बेताल आणि आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व सहयोगी पक्षाच्या नगरसेवक-नगरसेविकांनी त्यांच्या नगरसेवक पदाच्या राजीनाम्याची मागणी करणारे सह्यांचे निवेदन सादर केले. यावेळी सर्व नगरसेवकांनी सहयोग या निवासस्थानी जाऊन अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर आदरणीय सुनेत्रावहिनी पवार यांचे ओएसडी सचिन यादव यांच्याकडे निवेदन सुपूर्द करण्यात आले. या प्रसंगी नगराध्यक्ष सचिन सातव, उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, गटनेते संजय संघवी, उपगटनेते संपदा चौधर, प्रतोद विशाल हिंगणे, सभापती अमर धुमाळ, नवनाथ बल्लाळ, जयसिंग देशमुख, सविता जाधव, मनीषा चव्हाण तसेच नगरसेवक जय पाटील, विष्णुपंत चौधर, बिरजू मांढरे, अभिजीत चव्हाण, अभिजीत जाधव, अविनाश निकाळजे, अनुप्रिता डांगे-तांबे, रुपाली मलगुंडे, प्रवीण माने, धनश्री बांदल, भारती शेळके, प्रसाद खारतोडे, पूनम चव्हाण, मनिषा बनकर, सारिका वाघमारे, मंगल किर्वे, मंगल जगताप, गोरख पारसे,



शर्मिला ढवण, अल्ताफ सय्यद, अश्विनी सातव, राजेंद्र सोनवणे, प्रतिभा खरात, अफ्रिन बागवान, दर्शना तांबे, निलेश इंगुले, सोमनाथ गजाकस, अमोल कावळे, गणेश जोजारे आणि राहुल वाघोलीकर यांच्या सह्याचे निवेदन देण्यात आले. अजितदादा पवार यांच्याविषयी करण्यात आलेले वक्तव्य बारामतीकरांच्या भावना दुखावणारे असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त करत निषेध केला. अशा प्रकारच्या अपमानास्पद वक्तव्यांना जनतेकडून कधीही समर्थन मिळणार नाही, तसेच संबंधित नगरसेवकाविरोधात कठोर कारवाई करून त्यांचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी सर्व उपस्थितांनी एकमुखाने निषेध व्यक्त करत अजितदादांविषयी आदर व निष्ठा कायम असल्याची भावना व्यक्त केली.

## विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बैठकीत तीन प्रकरणांवर सुनावणी

**पुणे (दै. संध्या) :** विभागीय आयुक्त शीतल तेली उगले यांच्या अध्यक्षतेखाली पुणे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या तिमाही बैठकीत पुणे जिल्ह्यातील ३ प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. यावेळी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, डॉ. स्वाती देशमुख, समितीचे सदस्य सचिव तथा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.


### पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष - पाणीपुरवठा विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

अद्वितीय & Unique

विक्री कालावधी दिनांक : ०९/०६/२०२६ ते १८/०६/२०२६ दुपारी ०२:३० वा. पर्यंत

स्विकृती दिनांक : ०९/०६/२०२६ ते १८/०६/२०२६ दुपारी ०२:३० वा. पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : १९/०६/२०२६ ०३:०० नंतर

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2026/95 | पाणीपुरवठा विभाग | वाघोलीसह बंडगार्डन पाणीपुरवठा अंतर्गत विविध प्रभागांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करणे. | रू. ६,०७९/- | रू. ९९,९९,४२६.००/- | रू. ९९,९९४.००/- | १२ (बारा) महिने | श्री. अजित सणस (९६८९९३८७६५) |

अ) पुणे म.न.पा.ची वरील कामे ही अनुभवी/म.न.पा. मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून (कामासाठीच्या पूर्व गणनपात्रता अटी टेंडर सेटमध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.

ब) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

ड) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

इ) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (अजित सणस) | (राजेंद्र नगरे) | (एकनाथ गाडेकर) |
| शाखा अभियंता | उप अभियंता | कार्यकारी अभियंता |
| बंडगार्डन पाणीपुरवठा विभाग | बंडगार्डन पाणीपुरवठा विभाग | बंडगार्डन पाणीपुरवठा विभाग |
| पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका |

*जाहिरात क्रमांक : २/१९० दि. ०८/०६/२०२६*



### जाहीर नोटीस

आमच्या अशिलाच्या वतीने या जाहीर नोटिशीद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली मिळकतः

मौजे तुर्भे, जि. ठाणे येथील गट नं. ७९६ पैकी, क्षेत्रफळ ८०,९४० चौ. मीटर, सब प्लॉट बे-एफ, शेड नं. ए-१९ व बिल्डिंग नं. ए-२४, ग्राउंड व मेझानाईन मजल्यासह, ग्राउंड फ्लोअर क्षेत्रफळ ५५.७६ चौ. मीटर व मेझानाईन फ्लोअर क्षेत्रफळ २२.३० चौ. मीटर असलेली मिळकत.

सदर मिळकत महाराष्ट्र अँग्रीकल्चरल डेव्हलपमेंट अँड फर्टिलायझर प्रमोशन कॉर्पोरेशन लिमिटेड (मॅफको लि.) यांच्या मालकीची असून सदर मिळकत सध्या श्री. दिलीप दगडू नरवडे हे कर्जाकरिता एच डी एफ सी बँक, नारायणगाव शाखा, पुणे यांचेकडे सदर मिळकत गहाण ठेवत आहेत. तथापि, सदर भाडेपट्टा करारनामा दिनांक ०१/१२/१९७३ चे मूळ दस्तऐवज व दिनांक २९.०९.१९७५ मॅफको लि. यांचे पत्र दिनांक २१.०४.२०११ इतर संबंधित कागदपत्रे हरवलेली असून शोधूनही मिळून आलेली नाहीत.

त्यामुळे सदर मिळकतीवर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा अथवा बँकेचा हक्क, दावा, हितसंबंध, तारण, गहाण, भाडेपट्टा, वारसा हक्क, बोजा किंवा अन्य कोणताही दावा असल्यास, त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत त्याबाबतचे पुराव्यासह लेखी आक्षेप खाली सही करणाऱ्याकडे सादर करावेत. अन्यथा असा दावा अस्तित्वात नाही असे समजून पुढील व्यवहार करण्यात येईल.

दि.०५/०६/२०२६

स्थळ : नारायणगाव

सही/-
अँड शिवदास ज्ञानेश्वर तांबे
बी. कॉम.एल.एल.बी
सुवर्णा चेंबर्स, पुणे नाशिक हायवे,
नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे
मो.नं.९८६०२०७८५७



### महावितरण — ई–निविदा सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

अधीक्षक अभियंता, महावितरण, गणेशखिंड शहर मंडल, पुणे यांचेतर्फे मान्यताप्राप्त व नोंदणीकृत ठेकेदारांकडून रोटो सील पुरवण्याबाबतची ई–निविदा मागवण्यात येत आहेत. निविदा क्रमांक: ०१/२०२६–२७ असून, निविदा किंमत रु. ५ लाख आहे.सदर निविदा दि. १० जून ते १९ जून १४.०० वाजेपर्यंत उपलब्ध असून निविदा भरण्याची अंतिम तारीख १९ जून २०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत आहे. निविदेच्या अधिक माहितीसाठी https://etender.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

PRO/PZ/ 069/2026-27 अधीक्षक अभियंता, गणेशखिंड शहर मंडल, पुणे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### माजी महापौर दिवंगत भिकू वाघेरे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने माजी महापौर दिवंगत भिकू वाघेरे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. पिंपरी वाघेरे येथील भिकू वाघेरे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, माजी महापौर संजोग वाघेरे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य विठ्ठल उर्फ नाना काटे, माजी नगरसदस्य प्रभाकर वाघेरे, दत्तात्रय वाघेरे,उषा वाघेरे,उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सलग दुसऱ्यांदा केसदान; निशा अनिकेत प्रभु यांचा कॅन्सरग्रस्तांसाठी प्रेरणादायी उपक्रम



पिंपरी (दैनिक संध्या) : समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत सौ. निशा अनिकेत प्रभु यांनी कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी सलग दुसऱ्यांदा केसदान करून एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. कॅन्सरवरील उपचारांमुळे केस गमावलेल्या रुग्णांना आत्मविश्वास मिळावा आणि त्यांच्यासाठी विग तयार करता यावेत, या उद्देशाने त्यांनी आपल्या केसांचे दान केले. यापूर्वी ऑक्टोबर २०२३ मध्येही त्यांनी मुंबई येथील 'मदत ट्रस्ट'च्या माध्यमातून केसदान केले होते. त्या वेळी त्यांच्या या सामाजिक उपक्रमाची विविध माध्यमांनी दखल घेतली होती. समाजात केसदानाबाबत जनजागृती व्हावी आणि अधिकाधिक महिलांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, या हेतूने त्यांनी पुन्हा एकदा केसदान करण्याचा निर्णय घेतला. दीर्घकाळ केस वाढवून त्यांची योग्य निगा राखल्यानंतर त्यांनी दुसऱ्यांदा केसदान केले. या केसांचा उपयोग कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी विग तयार करण्यासाठी होणार आहे. उपचारांच्या काळात अनेक रुग्णांचा आत्मविश्वास कमी होतो. अशा परिस्थितीत केसदानासारखे योगदान त्यांना मानसिक बळ देण्यास आणि आत्मविश्वास पुनर्संचयित करण्यास मदत करते. सौ. निशा प्रभु या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असतात. समाजोपयोगी कार्यातून त्यांनी नेहमीच सामाजिक संवेदनशीलतेचा परिचय दिला आहे. "रक्तदान, अवयवदान याप्रमाणेच केसदान देखील समाजासाठी अत्यंत उपयुक्त आहे. आपल्या छोट्याशा योगदानातून एखाद्या रुग्णाच्या चेहऱ्यावर हास्य आणि आत्मविश्वास परत येऊ शकतो," असे मत निशा प्रभु यांनी व्यक्त केले. त्यांच्या या उपक्रमामुळे समाजात केसदानाबाबत सकारात्मक संदेश पोहोचत असून कॅन्सरग्रस्तांच्या मदतीसाठी अधिकाधिक नागरिकांनी पुढे यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### लोणावळ्यात मान्सूनची प्रतीक्षा कायम; उष्णतेने पर्यटक आणि शेतकरी दोघेही हैराण



लोणावळा (दैनिक संध्या) : पावसाळी पर्यटनासाठी जगप्रसिद्ध असलेल्या पर्यटननगरी लोणावळा शहराला मान्सूनच्या प्रतीक्षेचे वेध लागले आहेत. मागील वर्षी मे महिन्यामध्ये मान्सूनला सुरुवात झाली होती व 17 जून रोजी लोणावळ्यातील प्रसिद्ध असलेले भुशी धरण हे ओव्हर फ्लो झाले होते. साधारणपणे मागील तीन वर्षांचा अंदाज घेता 30 जूनपर्यंत भुशी धरण ओव्हर फ्लो होते व खऱ्या अर्थाने पावसाळी पर्यटनाच्या सीजनला सुरुवात होते. यावर्षी मात्र 7 जून ही तारीख आली तरी लोणावळा शहरामध्ये मान्सूनचे आगमन झालेले नाही. अवकाळी पाऊसदेखील यावर्षी तुलनेने कमी प्रमाणात शहरामध्ये झाला आहे. दरवर्षीच्या तुलनेमध्ये यावर्षी उष्णतादेखील जास्त राहिल्यामुळे लोणावळा शहरातील नागरिक हे गर्मीने हैराण झाले आहेत. 26 मे रोजी मान्सून हा केरळमध्ये दाखल होईल व आठवडाभरामध्ये तो महाराष्ट्रात सक्रिय होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र, मान्सूनचे आगमन उशिराने होत असल्यामुळे अद्यापदेखील पर्यटननगरी लोणावळा व मावळ तालुक्यामध्ये मान्सून सक्रिय झालेला नाही. वाढती उष्णता यामुळे नागरिक अक्षरशा हैराण झाले आहेत. पावसाळी पर्यटनासाठी लोणावळा, खंडाळा व मावळ तालुका ओळखला जातो. स्थानिक व्यावसायिकांनी मान्सूनच्या सीझनसाठी मोठी तयारी केली आहे. मात्र, अद्यापदेखील मान्सूनचे आगमन न झाल्यामुळे सर्वांच्याच लक्ष हे पावसाच्या आगमनाकडे लागले आहे. लोणावळा व खंडाळा परिसरामध्ये उन्हाळ्याच्या सुट्यांचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक दाखल झाले असले तरी गर्मीने ते अक्षरशा हैराण झाले आहेत. गाडीमधून अथवा हॉटेल व बंगल्यांच्या एसी खोल्यांमधून पर्यटक बाहेर पडत नाहीत.

### नाट्यगृहातील अग्निसुरक्षा यंत्रणा दुरुस्त




पिंपळे गुरव (दैनिक संध्या) : पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृहातील अग्निसुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींबाबत प्रशासनाने गंभीर दखल घेत तातडीने कार्यवाही केली आहे. नाट्यगृहातील सर्व अग्निशामक सिलिंडरची तपासणी करुन त्यांचे रिफिलिंग आणि नूतनीकरण पूर्ण करण्यात आले असून, सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली आहे. नाट्यगृहामध्ये प्रवेशद्वार आपत्कालीन मार्ग, स्टेज परिसर, बॅकस्टेज मेकअप रूम साऊंड व लाईट विभाग, इलेक्ट्रिकल पॅनल रूम तसेच प्रेक्षक हॉलमध्ये बसविण्यात आलेल्या सीओटू, एबीसी प्रकारच्या अग्निशामक सिलिंडर्स आणि फायर बॉलची तपासणी करण्यात आली. त्यानंतर सर्व उपकरणे अद्ययावत करून त्यांना नव्याने वैधता देण्यात आली आहे. दररोज विविध सांस्कृतिक सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक नाट्यगृहात येत असल्याने अग्निसुरक्षेचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या पार्श्वभूमीवर झालेल्या तातडीच्या कार्यवाहीमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यापुढेही नाट्यगृहातील अग्निसुरक्षा व्यवस्थेची नियमित तपासणी, फायर सेफ्टी ऑडिट आणि आवश्यक देखभाल वेळोवेळी करण्यात यावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. नागरिकांच्या सुरक्षेशी संबंधित महत्त्वाचा प्रश्न प्रभावीपणे मांडून प्रशासनाचे लक्ष वेधल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी आणि सांस्कृतिक क्षेत्रातील रसिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

# प्रभावी अंमलबजावणीसाठी महापालिकेची विशेष कार्यशाळा



पिंपरी (दै. संध्या)

केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शुक्रवारी ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्यासह अन्य महापालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचना क्र. एस.ओ. ३८८ (अ) द्वारे घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ जाहीर केले असून १ एप्रिल २०२६ पासून त्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयानेही घनकचरा व्यवस्थापन नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना नव्या नियमांची माहिती देण्यासाठी आणि प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, घनकचऱ्याचे स्रोतस्तरावर वर्गीकरण, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे ही काळाची गरज आहे. स्वच्छ, हरित आणि शाश्वत शहर उभारण्यासाठी प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मोठ्या आस्थापनांना नियमांच्या पालनासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार असून शहर विद्रूप करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पुढे बोलताना त्यांनी प्रत्येक नागरिकाने शहराला स्वतःचे घर समजून स्वच्छतेसाठी महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच गृहनिर्माण संस्थांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले. लोकसहभागातूनच स्वच्छ आणि सुंदर शहर घडू शकते, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी फूटपाथ, रस्ते आणि अतिक्रमणांवरील कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले. भविष्यात पिंपरी चिंचवड शहर देशातील स्वच्छ आणि आदर्श शहरांमध्ये अग्रस्थानी असेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आयुक्तांच्या हस्ते 'माझी वसुंधरा ५.०' अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उद्यान, पर्यावरण आणि आरोग्य विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी नवीन नियमांमुळे घनकचरा व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध, परिणामकारक आणि उत्तरदायी होणार असल्याचे सांगितले. नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय समन्वय, नियमित निरीक्षण आणि नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी केले. त्यांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ मधील विविध तरतुदींची सविस्तर माहिती देत कचऱ्याचे वर्गीकरण, संकलन, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट यासंदर्भातील जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या. तसेच नियमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी व्यापक जनजागृतीला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेस मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता मनोज सेठिया, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, उप आयुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट, सोहम निकम, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजू साबळे, सुधीर वाघमारे, योगेश फल्ले, शांताराम माने, राजेश भाट, अतुल सोनवणे, महेश आढाव, अंकुश झिटे यांच्यासह मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक आणि आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## ट्रॅव्हल्सकडून प्रवाशांची लूट; पुणे-नागपूर भाडे दुप्पट ते अडीच हजारांवर

पिंपरी (दै. संध्या)



उन्हाळी सूट्यांमध्ये गावी जाणाऱ्या प्रवाशांची शहरातील ट्रॅव्हल्स चालकांकडून दुप्पटीने भाडे आकारून आर्थिक लूट होत आहे. पुणे ते नागपूर प्रवासाचे इतर वेळेसचे तिकीट दीड हजार ते सोळाशे रूपये या दरम्यान आहे; मात्र सध्या खासगी ट्रॅव्हल्सवाल्यांकडून दोन ते अडीच हजार रुपये दर आकारला जात आहे; तसेच शनिवारी आणि रविवारी दरात आणखी वाढ केली जात असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये रोजीरोटीसाठी रोजगार आणि शिक्षणासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये कुटूंबासह बरेचजण गावाकडे जातात. एकाच वेळी गर्दी वाढत असल्याने रेल्वेचे आरक्षण फुल्ल झाले असून, एसटीचे तिकीट देखील लवकर मिळत नाही. त्यामुळे खासगी ट्रॅव्हल्स या परिस्थितीचा गैरफायदा घेत अव्वाच्या सव्वा दर आकारत आहेत. तसेच शहरातील आरटीओचे दुर्लक्ष असल्याने या चालकांची मनमानी सुरू असल्याने सुट्टीनिमित्त गावी जाणाऱ्या प्रवाशांच्या खिशाला कात्री बसत असल्याचे दिसून येत आहे.

## मा. नंदू शेठ लांडे यांना आदर्श चेअरमन पुरस्कार

### अण्णासाहेब मगर सहकारी बँकेचा 'भारत रत्न सहकारिता' पुरस्काराने गौरव

पिंपरी (दै. संध्या)



दिनांक ६ जून रोजी भारत को-ऑपरेटिव्ह बँकिंग संस्थेच्यावतीने लखनौ येथे आयोजित प्रशिक्षण शिबिरात अण्णासाहेब मगर सहकारी बँकेचे अध्यक्ष नंदू शेठ लांडे यांना आदर्श चेअरमन पुरस्कार मिळाला आहे तर बँकेस प्रतिष्ठेचा 'भारत रत्न सहकारिता' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बँकेला एकाच वेळी दोन पुरस्कार मिळाल्याने सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. दोन पुरस्कारांचा बहुमान

उत्कृष्ट अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक पुरस्कार अण्णासाहेब मगर सहकारी बँकेला या श्रेणीत उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरवण्यात आले. त्याचबरोबर उत्कृष्ट चेअरमन पुरस्कार म्हणून बँकेचे अध्यक्ष नंदूशेठ विठोबा लांडे पाटील यांना या वर्षीचा आदर्श चेअरमन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सेहेचाळीस बँकांनी सहभाग घेतला होता.बी.एन.सी आणि बँकर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतकूप अंतर्गत हे पुरस्कार देण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळ्यात बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह स्वीकारले.

या वेळी संचालक गणेश पवळे,संतोष भांगरे , रामदास काळजे , राजू सस्ते व बँक व्यवस्थापक माणिक येळवंडे यांनी

सदर प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेतला . या प्रशिक्षण शिबिरात बँकेचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

शिबीरार्थींना सहकार, व्यवस्थापन व बँकिंग क्षेत्रातील विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. सहकारी बँकिंग अधिक सक्षम करण्यासाठीच्या नव्या संकल्पनांवर यावेळी चर्चा झाली. सदर पुरस्कार प्राप्त होताच बँक पदाधिकाऱ्यांकडून आनंद व्यक्त करण्यात आला.

हा दुहेरी सन्मान म्हणजे बँकेच्या सर्व संचालक मंडळ, कर्मचारी आणि ग्राहकांच्या विश्वासाचे फळ असल्याची भावना अध्यक्ष नंदूशेठ विठोबा लांडे पाटील यांनी व्यक्त केली. 'भारत रत्न सहकारिता' सारख्या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने बँकेच्या कामाची दखल घेतली गेल्याने भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे, असेही ते म्हणाले. या यशाबद्दल अण्णासाहेब मगर सहकारी बँकेचे सर्व शाखेच्या स्तरातून अभिनंदन होत आहे.

## सुदर्शननगर चौक अंडरपासमधील अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करा

पिंपरी (दै. संध्या)

**माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची आयुक्तांकडे मागणी**



पिंपळे गुरव येथील सुदर्शन नगर चौकाजवळ असलेल्या 8 टू 80 गार्डन परिसरातील अंडरपासमध्ये वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून, या ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नाशिक फाटा ते हिंजवडी बीआरटीएस मार्गावर विकसित करण्यात आलेल्या या अंडरपासमध्ये स्वतंत्र बीआरटीएस मार्गिका असून, अत्यावश्यक सेवांच्या वाहनांव्यतिरिक्त इतर वाहनांना प्रवेशास मनाई आहे. मात्र, नियमांचे उल्लंघन करून अनेक खासगी वाहने या मार्गिकेतून प्रवास करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या ठिकाणी बीआरटीएस मार्गिकेत तीव्र वळण (शार्प टर्न) तसेच अपुरा प्रकाश असल्याने आजपर्यंत अनेक गंभीर अपघात घडले आहेत. काही नागरिकांना आपला जीवही गमवावा लागला आहे. मागील आठवड्यातच येथे तीन अपघात झाले असून, त्यामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला. आयान अयाज शेख (वय 21) या तरुणाचाही या अपघातात मृत्यू झाला असल्याचे काटे यांनी नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर अंडरपास परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे, पुरेशा प्रकाशव्यवस्थेची सोय करणे, इशारा फलक व वेग नियंत्रण यंत्रणा बसविणे तसेच बीआरटीएस मार्गिकेत खासगी वाहनांचा प्रवेश रोखण्यासाठी सुरक्षा रक्षक नियुक्त करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी महानगरपालिकेने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नाना काटे यांनी व्यक्त केली आहे.

## पालेभाज्यांच्या आवकेत घट, कोथिंबीर-मेथी ३० ते ४० रुपयांत

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवार (दि. ७) बाजारात गेल्या आठवड्याप्रमाणे फळभाज्यांचे दर स्थिर होते. पालेभाज्यांची आवक कमी झाल्यामुळे प्रति जुडी 30 ते 50 रुपयांना विक्री केली जात होती. बिन्स, पावटा आणि घेवड्याचे दर तेजीतच आहेत; मात्र गवार, शेवगा स्वस्त झाला आहे. कोथिंबीर व मेथीची जुडी 30 - 40 रुपये दराने विक्री केली जात आहे. गवार आणि शेवगा 50 - 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. तर वांगी, फ्लॉवरचा प्रतिकिलोचा दर 40 - 50 रुपये आहे. मिरची 50 रुपये, कांदे 100 रुपयांना पाच किलो दराने विक्री केली जात आहे. लसूण 100 - 150 रुपये, आले 80 - 90 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे.

फळभाज्यांचे दर पुढील प्रमाणे: रविवारी बाजारात गवार 70 रुपये, शेवगा 70, टोमॅटो 25, भेंडी 70, फ्लॉवर 50, कोबी 30, मिरची 50, गाजर 30, शिमला 80, लसूण 100 - 120, आले 70, वांगी 70, काकडी 40, कारले 80, कांदे 20 - 25 रुपये किलो, बटाटा 25- 30, बिन्स 100 रुपये किलो, पावटा 100, लाल भोपळा 40, घोसाळी 50, दोडका 70, तोंडली 50, बीट 40, दुधी 50, घेवडा 100 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे.

## चिंचवडमध्ये 'Made in Pakistan' चादरीची विक्री?

पिंपरी (दै. संध्या)




**महिलेचा व्हिडिओ व्हायरल, नागरिकांकडून चौकशीची मागणी**

पिंपरी-चिंचवड शहरातील चिंचवडगाव येथील श्री मोरया गोसावी मंदिर परिसरात भरलेल्या संकष्टी चतुर्थी यात्रेत कथितपणे 'Made in Pakistan' लेबल असलेली चादर विक्रीसाठी आल्याचा दावा समोर आला आहे. या संदर्भातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यावरून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. व्हिडिओमध्ये एका महिलेने यात्रेतून खरेदी केलेल्या चादरीवर 'Made in Pakistan' असे लेबल आढळल्याचा दावा केला आहे. संबंधित महिलेच्या म्हणण्यानुसार, चादर धुतल्यानंतर तिच्या एका कोपऱ्यात लपवलेले हे लेबल दिसून आले. देशात पाकिस्तानी वस्तूंवरील निर्बंध आणि संवेदनशीलता लक्षात घेता अशा वस्तू स्थानिक बाजारपेठेत विक्रीसाठी कशा उपलब्ध झाल्या, असा सवाल तिने उपस्थित केला आहे.

या व्हिडिओनंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत असून, यात्रेतील तसेच रस्त्यावरील स्टॉल्सवर विक्रीसाठी ठेवण्यात येणाऱ्या वस्तूंची तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

अनेकांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तूंचा उगम, पुरवठा साखळी आणि विक्रेत्यांची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. मात्र, या प्रकरणातील दाव्यांची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही.

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थी सत्कार व भव्य करिअर मार्गदर्शन मेळावा उत्साहात संपन्न

पिंपरी (दै. संध्या)



छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (पुणे विभाग) यांच्या वतीने वाकड येथील The Gazebo World of Veg येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व भव्य करिअर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

दहावी व बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना करिअर निवडीबाबत योग्य दिशा मिळावी तसेच पालकांच्या मनातील संभ्रम दूर व्हावा यासाठी विविध क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

जागतिक स्तरावरील HR तज्ज्ञ व AI रणनीतीकार डॉ. संग्रामसिंह पवार यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक करिअर संधी याविषयी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. करिअर समुपदेशक रचना सारंग पाटील यांनी विद्यार्थ्यांची मानसिक तयारी, व्यक्तिमत्व विकास आणि योग्य करिअर निवड याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

IMA महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील संधी, आरोग्य आणि करिअर नियोजन या विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तर शौर्यचक्र व सेना मेडल सन्मानित कर्नल सचिन रंदले यांनी सैन्यदल, UPSC आणि स्पर्धा परीक्षांमधील करिअर संधींबाबत मार्गदर्शन केले.

माणुसकीची चळवळचे अध्यक्ष राज देशमुख यांनी राष्ट्रनिर्माण, सामाजिक नेतृत्व आणि युवकांची जबाबदारी याविषयी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थी आणि पालकांनी तज्ज्ञांशी थेट संवाद साधून विविध शंकांचे निरसन केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचा, आधुनिक तंत्रज्ञानाशी मैत्री करण्याचा आणि कठोर परिश्रमाच्या बळावर यश संपादन करण्याचा संदेश दिला.

या कार्यक्रमास अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनचे ट्रस्टी संदीप नवसुपे, बाबा जाधव, आनंद गुळुमकर, स्नेहल गायकवाड आणि ओंकार देशमुख उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अँड.अश्विनी शेवाळे लाड ,राहुल पवार, संदीप निकम, अतुल बिराजदार, सुभाष पाटील, अमर भोसले, रवी साळुंखे, महेश पाटील, कैलास बाकेल, गणेश गायकवाड, अमोल भोसले, प्रशांत माने, प्रमोद साबळे आणि अमृत शिंदे निलेश देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ११ मोबाईल हँडसेट बारामती तालुका पोलिसांकडून नागरिकांना परत

## सहा महिन्यात हरवलेले चोरी गेलेले २२ मोबाईल शोधून बारामती पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

**बारामती (दै. संध्या)**



हरवलेला चोरी गेलेला मोबाईल पुन्हा मिळणे हे अनेकांसाठी अशक्यप्राय वाटत असते. मात्र बारामती तालुका पोलिसांनी तंत्रज्ञानाची साथ, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि नागरिकाभिमुख कामकाजाच्या बळावर ही समजूत खोटी ठरविली आहे. आधुनिक प्रणालीच्या माध्यमातून हरवलेल्या मोबाईलचा माग काढत पोलिसांनी गेल्या सहा महिन्यांत तब्बल २२ मोबाईल शोधून त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात दिले आहेत. चार लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल परत मिळाल्याने संबंधित नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून बारामती तालुका पोलिसांच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे. बारामती तालुका पोलीस स्टेशनकडे मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा तांत्रिक पद्धतीने शोध घेण्याची मोहीम हाती घेण्यात आली. जानेवारी महिन्यात ११ मोबाईल शोधून संबंधितांना परत देण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा दोन दिवसांपूर्वी आणखी ११ मोबाईलचा शोध घेण्यात पोलिसांना यश आले. त्यामुळे आतापर्यंत एकूण २२ मोबाईल मूळ मालकांपर्यंत पोहोचविण्यात बारामती तालुका पोलिसांना यश आले आहे. शोधण्यात आलेल्या मोबाईलमध्ये विविध कंपन्यांच्या महागड्या मोबाईलचा समावेश असून त्यांची एकत्रित किंमत चार लाख रुपयांहून अधिक आहे. विशेष म्हणजे हे मोबाईल धारक बारामतीसह विविध गावांतील तसेच इतर जिल्ह्यांतील नागरिक आहेत. हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने संबंधित नागरिकांनी बारामती तालुका पोलिसांचे आभार मानत समाधान व्यक्त केले. दरम्यान, आणखी दोन मोबाईलचे ट्रेसिंग सुरू असून त्यांच्या मूळ मालकांचा शोध घेण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे मोबाईलही लवकरच संबंधितांच्या ताब्यात देण्यात येतील, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली. हरवलेल्या मुद्देमालाचा शोध घेऊन तो मूळ मालकांपर्यंत पोहोचविण्याच्या बारामती तालुका पोलिसांच्या या उपक्रमामुळे पोलिसांबद्दलचा नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होत असल्याचे चित्र आहे.


सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गेला अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव पोलीस अंमलदार नितीन ढवाण शाहरुख शेख यांनी केली आहे.

> ‘हरवलेला चोरी गेलेला मुद्देमाल मूळ मालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पोलीस यंत्रणा प्रयत्नशील असते. नागरिकांना पुन्हा मोबाईल मिळाले याचे समाधान आहे.’
> **-चंद्रशेखर यादव, पोलीस निरीक्षक**

# इंजिनीअरिंग, फार्मसी, ॲग्रीकल्चर CET निकालाला विलंब!

## सजग नागरिक मंचाकडून मंत्री चंद्रकांत पाटलांकडे नाराजी

**पुणे (दै. संध्या)**



महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित इंजिनीअरिंग, फार्मसी आणि ॲग्रीकल्चर CET च्या निकालाला होणाऱ्या विलंबावर सजग नागरिक मंचाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना पत्र लिहून निकाल तातडीने जाहीर करण्याची मागणी केली आहे.

१० ते २० एप्रिल दरम्यान पहिली CET आणि १२ ते २१ मे दरम्यान दुसरी CET संगणकावर घेण्यात आली. मात्र, परीक्षा होऊन ५० दिवस उलटले तरी निकालाची तारीख जाहीर करण्यात आलेली नाही. संगणकावर झालेल्या परीक्षेचा निकाल जाहीर करायला इतका विलंब का, असा सवाल वेलणकर यांनी उपस्थित केला आहे. वेलणकर म्हणाले, “यंदा महाराष्ट्र बोर्डाने १२ वीची लेखी परीक्षा १४ लाख विद्यार्थ्यांसाठी घेतली आणि ५० दिवसांत निकालही जाहीर केला. मात्र केवळ ७ लाख विद्यार्थी बसलेल्या संगणकीय CET चा निकाल ५० दिवसांनंतरही नाही.” शेजारील कर्नाटकात २३-२४ एप्रिलला झालेल्या CET चा निकाल ६ जूनला जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विलंब अक्षम्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. बारावीचा निकाल लवकर लागूनही व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या CET चा निकाल ३५ दिवसांनंतरही जाहीर न होणे हे विद्यार्थ्यांचे दुर्दैव आहे. त्यामुळे पुढील प्रवेशप्रक्रिया संथ गतीने चालते आणि महाविद्यालये सुरू व्हायला १५ ऑगस्ट उजाडतो, असेही त्यांनी नमूद केले. NEET परीक्षेतील घोळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आधीच अस्वस्थता आणि संताप आहे. अशा परिस्थितीत CET चे निकाल लवकर लागणे अपेक्षित असल्याचे वेलणकर यांनी पत्रात म्हटले आहे.

# चाकण भागात हातभट्टीवरची कारवाई म्हणजे मलमपट्टीचा फार्स

**चाकण (दै. संध्या)**

प्रचंड वेगाने विस्तारणाऱ्या चाकण भागात हातभट्टी दारूचे अड्डे फोफावले असून, यावरची कारवाई म्हणजे निव्वळ मलमपट्टीचा फार्स ठरू लागला आहे. चाकण भागातील इंद्रायणी, भीमा आणि भामा नद्यांचे किनारे हातभट्टीच्या दारूने व्यापले आहेत.

शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवणाऱ्या हातभट्टी सारख्या व्यवसायाने केवळ आर्थिक नुकसान नाही तर सामाजिक स्वास्थ्यही धोक्यात आणले आहे. हातभट्टीच्या विषारी दारुमुळे विषबाधा, अंधत्व येणे आणि मृत्यू होण्याच्या घटना नित्याच्या बनत चालल्या आहेत. खेड तालुक्यातील बऱ्याच नद्यांच्या काठावर, ओढ्यांमध्ये, निर्जन स्थळी आणि काही घरांमध्येही चोरट्या पद्धतीने हातभट्टी चालवल्या जातात.

युरिया आणि नवसागरा सारख्या घातक रसायनांचा वापर करून तयार होणारी ही लाखो लिटर विषारी दारू रात्रीच्या अंधारात छोट्या - मोठ्या वाहनांमधून पुणे, पिंपरी, चिंचवड भागात रवाना होत आहेत. वाढत्या तक्रारी आणि नागरिकांच्या दबावानंतर चाकण आणि महाळुंगे इंगळे पोलिसांनी हातभट्टीच्या अड्ड्यावर धडक मोहीम सुरू केली असून ही कारवाई निव्वळ फार्स ठरत आहे.

# कै. दादू बाप्पू लोणारी यांच्या स्मरणार्थ हिंगणगावात वृक्षवाटप

**कोरेगाव मूळ (दै. संध्या)**




जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत आणि कै. दादू बाप्पू लोणारी यांच्या स्मृतींना अभिवादन करत हिंगणगाव येथे वृक्षवाटपाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. मुकुंद दादू लोणारी यांच्या पुढाकारातून मांगिरबाबा देवस्थान परिसरालगतच्या घराघरांत वृक्षांचे वाटप करण्यात आले. माजी सरपंच सागर आनंता थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आला. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि कमी होत चाललेले हरितावरण लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास सरपंच शशिकला पोपळघट यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच डॉ. आण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे हवेली तालुका अध्यक्ष भारत कैलास लोणारी, दादाराम शेंडगे, सूरज साळवे, निशिकांत मुकुंद लोणारी, किरण पवार, काळुराम थोरात, सुनील थोरात, ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक कुंडलिक थोरात यांची उपस्थितीही लक्षवेधी ठरली.

### घराघरांत पोहोचला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

उपस्थित मान्यवरांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत ग्रामीण भागात हरित चळवळ अधिक बळकट करण्याची गरज व्यक्त केली. वृक्षवाटपाचा उद्देश केवळ रोपे देणे नसून प्रत्येक कुटुंबाने त्यांचे संगोपन करून पर्यावरण रक्षणात सक्रिय सहभाग नोंदवावा, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

मांगिरबाबा देवस्थान परिसर हरित करण्याच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गावात पर्यावरणप्रेमाचे वातावरण निर्माण झाले. कै. दादू बाप्पू लोणारी यांच्या स्मृती जपत आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम ग्रामविकास आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सुपा पोलिसांची तत्पर कारवाई; अपहरण झालेल्या युवकाची सुखरूप सुटका

**सुपा (दै. संध्या)**



दि. 07/06/2026 रोजी सुपा पोलीस स्टेशन हद्दीतून ऋषिकेश विजय चांदगुडे (रा. दंडवाडी, ता. बारामती, जि. पुणे) याचे अपहरण झाल्याची माहिती प्राप्त झाली. सदर घटनेत लाल रंगाची स्विफ्ट कार क्र. MH-42-BJ-4445 मधून ओंकार प्रकाश भोसले व तन्मय सुधीर साळुंखे यांनी ऋषिकेश चांदगुडे यास जबरदस्तीने घेऊन सासवडच्या दिशेने नेल्याची माहिती मिळाली.

सदर माहिती प्राप्त होताच सहाय्यक पोलीस निरीक्षक नवसरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक जिनेश कोळी, पोलीस हवालदार विशाल गजरे, पोलीस हवालदार रुपेश साळुंखे, पोलीस हवालदार संदीप लोंढे, चालक पोलीस शिपाई सोमनाथ होले, पोलीस शिपाई सागर वाघमोडे, पोलीस शिपाई संतोष जावीर, पोलीस शिपाई भाऊसाहेब चौधरी, महिला पोलीस हवालदार दिपाली मोहिते, पोलीस शिपाई सचिन दरेकर व पोलीस शिपाई विलास वाघमारे यांचे विशेष पथक तात्काळ रवाना करण्यात आले. तसेच जेजुरी, सासवड, उरुळीकांचन व यवत पोलीस स्टेशन यांना नाकाबंदीबाबत सूचना देण्यात आल्या.

तपासादरम्यान कुलदीप चांदगुडे यांना प्राप्त झालेल्या मोबाईल कॉलची माहिती मिळाल्यानंतर संबंधित मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. त्यामध्ये लोकेशन दिवेघाट परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक जिनेश कोळी, पोलीस हवालदार रुपेश साळुंखे, पोलीस हवालदार विशाल गजरे, चालक पोलीस शिपाई सोमनाथ होले, पोलीस शिपाई विलास वाघमारे व पोलीस शिपाई भाऊसाहेब चौधरी यांनी तात्काळ दिवेघाट परिसरात जाऊन संशयित वाहनाचा पाठलाग सुरू केला.


दरम्यान सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कदम यांच्याशी संपर्क साधून मदत मागविण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक जाधव व त्यांचे पथक मदतीस दाखल झाले. संयुक्त कारवाईदरम्यान झेंडेवाडी, ता. पुरंदर येथे संशयित स्विफ्ट वाहन अडविण्यात आले.

# व्यवसायातील वर्चस्व आणि कुटुंबाचा आधारवड

आळंदी (दै. संध्या) : अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि कुटुंबाप्रती असलेल्या समर्पणाच्या बळावर व्यवसाय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या श्रीमती निर्मलाताई अनिलशेठ भांबुर्डेकर यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीचा सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कै.अनिलशेठ भांबुर्डेकर यांच्या निधनानंतर १९८२ पासून सुरू असलेल्या ‘भांबुर्डेकर सराफ अँड ज्वेलर्स’ या प्रतिष्ठित व्यवसायाची जबाबदारी निर्मलाताईंनी समर्थपणे सांभाळली. पारंपरिक मूल्यांची जपणूक करत आधुनिक व्यावसायिक दृष्टीकोन स्वीकारत त्यांनी व्यवसायाला नवे आयाम प्राप्त करून दिले. त्यामुळे आळंदी व परिसरात यशस्वी महिला उद्योजिका म्हणून त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

# जेजुरी गडावर पुजाऱ्यास मारहाण; गुन्हा दाखल

**जेजुरी (दै. संध्या)**



महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरी येथील श्री खंडोबा मंदिर आवारात पुजाऱ्यास मारहाण व धमकी दिल्याची घटना घडली असून या प्रकरणी जेजुरी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की पुजारी जेजुरी गडावरील अमर महादेव बारभाई (वय ३८) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,रविवारी खंडोबा मंदिर परिसरात पालखी ठेवण्याच्या ठिकाणी काही भाविक चप्पल घालून आले होते. यावेळी पुजारी बारभाई यांनी येथे चप्पल घालून का आलात असे विचारले असता वाद निर्माण झाला. यावेळी आरोपींनी शिवीगाळ करत अमर बारभाई यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली . घटनास्थळी उपस्थित इतर पुजाऱ्यांनी मध्यस्थी करून वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. पुजारी अमर बारभाई हे मारहाणीत जखमी झाले असून त्यांच्यावर जेजुरी ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी राजू आनंदा नवले,हर्षद राजू नवले आणि वरनीत राजू नवले तिघेही रा.कामशेत ता.मावळ या तिघांविरुद्ध जेजुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धार्मिक स्थळाच्या पवित्र परिसरात घडलेल्या या घटनेमुळे भाविक व स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून मंदिर परिसरातील शिस्त व सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जेजुरी गडावरील गुरव,वीर,घडशी,कोळी या पुजारी सेवक वर्गाने जेजुरी पोलिस स्टेशन येथे जावून या घटनेतील आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. जेजुरी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक वाकचौरे हे या प्रकरणी तपास करीत आहेत.

# चाकण प्लांटमधून १०००व्या इलेक्ट्रिक एससीव्हीचे प्रस्थान

**चाकण (दै. संध्या)**



इलेक्ट्रिक व्यावसायिक वाहन क्षेत्रातील आघाडीची कंपनी एका मोबिलिटीने चाकण येथील आपल्या उत्पादन प्रकल्पातून १०००व्या स्मॉल कमर्शियल व्हेईकल (एससीव्ही)चे यशस्वी प्रस्थान केल्याची घोषणा केली. कंपनीच्या शाश्वत आणि शून्य-उत्सर्जन वाहतूक क्षेत्रातील वाटचालीतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या ऐतिहासिक टप्प्याचे औचित्य साधत कंपनीने १०००वे वाहन असलेली एका 6S ही इलेक्ट्रिक प्रवासी तीनचाकी पुण्यातील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट यांना सुपूर्द केली. चालकासह सहा प्रवाशांची क्षमता असलेली ही भारतातील पहिली स्टीअरिंग-व्हीलयुक्त इलेक्ट्रिक प्रवासी रिक्षा असून ट्रस्टच्या सामाजिक आणि जनकल्याण उपक्रमांसाठी तिचा वापर केला जाणार आहे.

याच कार्यक्रमात कंपनीने आपली एका 3S इलेक्ट्रिक तीनचाकी भारतातील मारिसा गेराईस यांच्याकडे सुपूर्द केली. या हस्तांतरणातून भारत आणि नेदरलँड्स यांच्यातील हरित वाहतूक क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ झाल्याचे अधोरेखित करण्यात आले.

कंपनीची धोरणात्मक भागीदार संस्था VDL Group ही नेदरलँड्समध्ये कार्यरत आहे.

# गोळीबार करणारे गजाआड

दौंड (दै. संध्या) : दौंड तालुका पाटस येथे शुक्रवार दिनांक पाच जून रोजी दुपारी अडीचच्या सुमारास भर चौकामध्ये गोळीबार करून दहशत माजवणाऱ्यांवरती यवत पोलीस प्रशासनाने मोठी कारवाई केली फिर्यादी सुरज राजेंद्र कुऱ्हाडकर, वय 32 वर्षे, व्यवसाय ट्रक चालक, रा. अंबिकानगर, ता. दौंड, जि. पुणे. यांच्या सांगण्यावरून1आरोपी ) संतोष बाळकृष्ण कडु रा. बेटवाडी ता. दौंड जि. पुणे. 2) आण्णा बाबु गायकवाड 3) रावसाहेब गंगाराम पालवे 4) सुधीर आण्णा फुलमाळी 5) रामा बाजीराव गायकवाड 6) अनिल रामा गायकवाड सर्व रा. जोशीवस्ती ढोकराई फाटा ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर व इतर 4 ते 5 अनोळखी इसम सदर आरोपी वरती कलम 110,118, 189,191,190,352,352,351,इत्तर गुन्हे दाखल केले आहे.

# चाकणला रक्तदान शिबिरात दीडशे बाटल्यांचे संकलन

**चाकण (दै. संध्या)**



रक्ताचा तुटवडा भासू नये व रक्तदान शिबिराच्या माध्यमातून एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचू शकते, हा हेतू डोळ्यासमोर ठेवून चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात दीडशे रक्तांच्या बाटल्यांचे संकलन करण्यात आले.

येथील मुटकेवाडीतील मांजरे कॉम्प्लेक्स मध्ये या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती उद्योजक बाळासाहेब मांजरे व राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सचिन मांजरे यांनी दिली. फोकस फिटनेस जिम, सचिनदादा किरणशेठ मांजरे मित्र परिवार व रोटरी क्लब ऑफ चाकण एअरपोर्ट आणि संजीवनी ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित या रक्तदान शिबिरात दीडशे बाटल्या संकलित करण्यात आल्या. शिबिरार्थींचा यावेळी प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, समाज प्रबोधनकार ह.भ.प. मुक्ताजी नाणेकर, माजी आमदार दिलीप मोहिते, उद्योजक बाळासाहेब मांजरे, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सचिन मांजरे, उद्योजक विकास नाणेकर, अ‍ॅड. शंकर महाराज शेवाळे, संतोष वाव्हळ, इकबाल शेख, सुधीर वाघ, सचिन आरुडे, डॉ. मोहिनी मांजरे, प्रकाश मुटके, मनीष गुगळे, अ‍ॅड. नारायण ढोकले, निशा मांजरे, दीप्ती भोगाडे, दत्तात्रय पाचुंदकर आदी उपस्थित होते.

सचिन मांजरे व बाळासाहेब मांजरे यांनी सांगितले की," अपघात ग्रस्तांचे प्राण वाचण्यासाठी रक्ताची गरज असते. रक्ताचा एक थेंब माणसाचा जीव वाचू शकतो. त्यामुळे या रक्तदान शिबिराला तरुण व तरुणींचा प्रचंड प्रतिसाद मिळाला." मुरलीधर मांजरे यांनी आभार मानले.

# हुमणी अळी नियंत्रणासाठी कृषी विभागाकडून प्रकाश सापळ्याचे प्रात्यक्षिक

**यवत (दै. संध्या)**



महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी विविध जनजागृती मोहिमा राबविण्यात येत आहेत. दौंडचे तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाणे, मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप आणि उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतीविषयक विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले जात आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून दौंड तालुक्यातील खामगाव येथे प्रगतशील शेतकरी दत्तात्रय सोपान नागवडे यांच्या शेतावर 'हुमणी अळी नियंत्रण' या विषयावर विशेष प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी शेतकऱ्यांना हुमणी अळीच्या जीवनचक्राची शास्त्रीय माहिती देत, ती पिकांसाठी कशी घातक ठरते, याचे गांभीर्य पटवून दिले. हुमणीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर हा अत्यंत स्वस्त आणि प्रभावी उपाय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रकाश सापळ्यांकडे आकर्षित होणाऱ्या भुंग्यांचा नायनाट केल्यास पुढील हंगामातील पिकांचे मोठे नुकसान टाळता येते, असे त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितले.

यावेळी पंढरीनाथ कुतवळ यांनी प्रकाश सापळ्यांची कार्यपद्धती आणि ते लावण्याच्या योग्य वेळेबाबत शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. निसर्गातील कीटक नियंत्रणासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

# सार्वजनिक वाचनालयाचा पर्यावरण दिनी स्तुत्य उपक्रम


**चाकण (दै. संध्या)**



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून येथील डॉ. केशव बळीराम हेडगेवार सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांचा व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा मोगऱ्याच्या कुंड्या व पुस्तक देवून सन्मान करण्यात आला. चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ तसेच विषय समित्यांचे सभापती व सर्व नगरसेवक उपस्थित होते. मनीषा गोरे, रणजित जरे, रुपाली कांडगे, नितीन गोरे, राहुल नायकवाडी, मंगेश कांडगे आदींनी आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते अरुण साळुंके यांच्या कार्याचा गौरव केला. साळुंके यांनी सांगितले की, वाचनालयात स्पर्धा परीक्षेसह चौदा हजार पुस्तके आहेत. या वाचनालयाचा चाकण येथील नागरिकांनी लाभ घेतला पाहिजे. अरुण साळुंके यांनी प्रास्ताविक केले. सुखदेव गायकवाड सूत्रसंचालन, तर विवेक जाधव यांनी आभार मानले.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे



## डेल्सी रोड्रिग्ज व त्यांच्या शिष्टमंडळाचे आगमन

मुंबई (दैनिक संध्या) : व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रोड्रिग्सज व त्यांचे शिष्टमंडळाचे छत्रपती संभाजीनगर येथून छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथे आज सायं ४.०० वाजता आगमन झाले. यावेळी मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिनव देशमुख, सामान्य प्रशासन (राजशिष्टाचार) विभागाच्या उपसचिव क्रांती पाटील, व्हेनेझुएलाचे प्रतिनिधी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथून व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रोड्रिग्सज व त्यांच्या शिष्टमंडळाचे आज सायं ५.४० वाजता प्रयाण केले. यावेळी मुंबईचे अतिरिक्त पोलीस आयुक्त अभिनव देशमुख, सामान्य प्रशासन (राजशिष्टाचार ) विभागाच्या उप सचिव क्रांती पाटील, व्हेनेझुएलाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## छगन भुजबळ दिल्लीत आले असते तर...

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात गेल्या दोन दिवसांपासून सुरु असलेल्या राज्यसभेच्या उमेदवारीच्या हायव्होल्टेज ड्रामावर अखेर पडदा पडला आहे. सुनेत्रा पवार यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी अजित पवार गटाकडून ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचे नाव आघाडीवर होते. मात्र, ऐनवेळी भुजबळांनी या उमेदवारीला नकार दिल्यानंतर पक्षाने प्रफुल्ल पटेल यांचे खंदे समर्थक राजेंद्र जैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. या संपूर्ण घडामोडींवर खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया देत अजित पवार गटाला टोला लगावला. अजित पवार गटात मंत्रिपदावरून आणि उमेदवारीवरून सुरू असलेल्या या अंतर्गत गोंधळावर सुप्रिया सुळे यांनी छगन भुजबळांबद्दल भाष्य केले. छगन भुजबळ यांनी शून्यातून आपले विश्व निर्माण केले आहे. त्यांनी पक्षासाठी मोठे त्याग आणि कष्ट केले असून ते नेहमीच आदरणीय पवार साहेबांच्या सुख-दुःखात सोबत राहिले आहेत. त्यांच्याविषयी माझ्या मनात नेहमीच कृतज्ञतेची भावना आणि ऋण राहील," असे सुळे म्हणाल्या.

## शेतकऱ्यांशी चुकूनही दगाफटका करू नये



मुंबई (दैनिक संध्या) : शेतकरीकर्जमाफीयोजनेमुळे खरंतर शेतकऱ्यांना दिलासा मिळाला पाहिजे. पण महाराष्ट्र सरकारच्या शेतकरी कर्जमाफी योजनेवरुन वाद वाढत चालला आहे. याचं मुख्य कारण आहे, सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळणार नाहीय. महायुती सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली आहे. या योजनेसाठी जवळपास 36 हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पण या योजनेत काही अटी सुद्धा घालण्यात आल्या आहेत. ज्याचा राज्यातील 12 लाख 71 हजार शेतकऱ्यांना फटका बसेल असा अंदाज आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या या शेतकरी कर्जमाफी योजनेवरुन वातावरण तापत चाललं आहे. आता शरद पवार पक्षाचे नेते आणि आमदार रोहित पवार यांनी एक्सवरुन पोस्ट करुन इशारा दिला आहे. मंत्रिमंडळ बैठकीची एक नोट बाहेर आली आहे. या नोटमधला मजकूर रोहित पवार यांनी पोस्ट केला आहे. "मंत्रिमंडळ बैठकीच्या नोटमध्ये स्वतः सरकारच सांगत आहे की 'अटी-शर्ती टाकल्याने कर्जमाफीसाठी कमीत कमी निधी लागेल', हा आहे या फसव्या सरकारचा फसवा चेहरा ! आहे" अशी टीका रोहित पवार यांनी केली आहे. "हा अहवाल देणाऱ्या अधिकाऱ्यांना सर्वात आधी हाणले पाहिजे, शेतकऱ्यांप्रती संवेदना नसणारे अधिकारी सरकारमध्ये असले तरी काही प्रमाणात शेतकरीपुत्र देखील आहेत, ही नोट बाहेर आणणाऱ्या अधिकाऱ्याचे सर्व शेतकऱ्यांच्या वतीने आभार...!" असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे. "मंत्रिमंडळ बैठकीत ही नोट मांडली गेली असताना एकाही मंत्र्याने तोंड उघडले नाही, सर्व मूग गिळून गप्प बसले याच दुःख आहे, कदाचित या योजनेतून टक्केवारीचा मालिदा मिळणार नाही म्हणून गप्प बसले असावेत" असा आरोप रोहित पवार यांनी केला.

# 'स्फोटके नियम २००८' मध्ये सुधारणेसाठी केंद्राला प्रस्ताव सादर करणार

### जीवितहानी टाळण्यासाठी स्वयंचलित यंत्रणेवर भर; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर सादरीकरण

■ नागपूर (दै. संध्या)



नागपूर जिल्ह्यात मागील अडीच वर्षात स्फोटकांच्या कंपन्यांमधील अपघातांमध्ये जीवितहानीच्या घटना लक्षात घेता 'स्फोटके नियम २००८' मध्ये सुधारणा सुचविणारा प्रस्ताव राज्य शासन केंद्राला सादर करणार आहे. या प्रस्तावाच्या मसुद्यात जीवितहानी टाळण्यासाठी कंपन्यांमध्ये स्वयंचलित प्रक्रियेसह सुरक्षेशी संबंधित जागतिक मानकांचा अवलंब करण्याच्या शिफारसी सुचविण्यात आल्या आहेत.

आज रामगिरी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्या नेतृत्वाखालील अभ्यासगटाने या मसुद्याचे सादरीकरण केले. यात राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचे तज्ज्ञ तसेच स्फोटके निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या प्रतिनिधींचा प्रामुख्याने समावेश होता. अभ्यासगटाने प्रस्तावाच्या मसुद्यात अनेक शिफारसी सुचविल्या आहेत. त्यात प्रामुख्याने स्फोटकांच्या निर्मिती प्रक्रियेतील जोखीम कमी करण्यासाठी ती जास्तीत जास्त प्रमाणात स्वयंचलित करण्यात यावी व त्यासाठी रोबोट्सचा वापर करावा, प्रत्यक्ष जोखमीच्या प्रक्रियेच्या जागी कमीतकमी मनुष्यबळ उपस्थित राहील, हे सुनिश्चित करावे, तसेच त्यासाठी सुरक्षेशी संबंधित जागतिक मानकांचा आधार घेण्यात यावा, या प्रमुख शिफारसींचा समावेश आहे. या शिफारसींना अनुसरून स्फोटके नियम २००८ मध्ये सुधारणा प्रस्तावित केल्या जाणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर जिल्ह्यातील स्फोटकांच्या कंपन्यांमधील अपघातांच्या घटनांची अत्यंत गंभीर दखल घेऊन स्फोटकांशी संबंधित नियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविण्याचे सूतोवाच केले होते. याअनुषंगाने अभ्यास करण्याच्या सूचना त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांना दिल्या होत्या. त्यानंतर पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वातील अभ्यासगटाने यासंदर्भात विविध घटकांशी चर्चा करून नियमातील प्रस्तावित सुधारणांचा एक मसुदा तयार केला आहे. या प्रस्तावित मसुद्याचे सादरीकरण आज मुख्यमंत्र्यांसमोर करण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी सादरीकरण केले. यावेळी अभ्यास गटाचे राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयाचे संचालक ए.आर. सोनटक्के, सहाय्यक संचालक गगन उपाध्याय आणि कंपन्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.



# 'दिलखुलास' मध्ये ९ आणि १० जून रोजी डॉ. प्रियांका धायतडक यांची विशेष मुलाखत

■ मुंबई (दै. संध्या)

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात 'जागतिक दृष्टीदान दिनानिमित्त' विशेष भाग प्रसारित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात जे.जे. रुग्णालयातील सहयोगी प्राध्यापक व नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रियांका धायतडक यांनी दृष्टीदानाचे महत्त्व, नेत्रदानाची प्रक्रिया तसेच समाजामध्ये प्रचलित असलेल्या विविध गैरसमजांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले आहे. 'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, दि. ९ जून आणि बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून प्रसारित होणार आहे. तसेच ही मुलाखत न्यूज ऑन एआयआर या ॲपवर देखील प्रसारित होणार आहे. या मुलाखतीचे निवेदन निवेदक हर्षदा कुलकर्णी यांनी केले आहे. दृष्टी ही मानवाला लाभलेली अत्यंत मौल्यवान देणगी असून अनेक व्यक्ती कॉर्नियाच्या अंधत्वामुळे दृष्टीपासून वंचित राहतात. अशा व्यक्तींना पुन्हा प्रकाशाचा अनुभव देण्यासाठी दृष्टीदान ही अत्यंत महत्त्वाची आणि समाजोपयोगी चळवळ आहे. अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा आणि या कार्यात सहभागी व्हावे, यासाठी जागतिक दृष्टिदान दिन साजरा केला जातो. त्याअनुषंगाने 'दिलखुलास' कार्यक्रमातून डॉ. धायतडक यांनी दृष्टीदान म्हणजे नेमके काय, नेत्रदानाची प्रक्रिया कशी पार पडते, कोण व्यक्ती नेत्रदान करू शकते, तसेच नेत्रदानाबाबत समाजात असलेले विविध समज-गैरसमज यावर सविस्तर माहिती दिली आहे. याशिवाय मृत्यूनंतर अल्पावधीत नेत्रदान करण्याचे महत्त्व आणि त्यातून अंधत्वग्रस्त व्यक्तींच्या जीवनात होणारा सकारात्मक बदल याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

## नगरसेवकांवर विश्वास नाही का?

■ नाशिक (दै. संध्या)

नाशिक विधान परिषद निवडणूक बिनविरोध होण्याची चिन्हे दिसत नाहीयत. नरेंद्र दराडे हे महायुतीचे अधिकृत उमेदवार आहेत. पण बंडखोरी करुन गोकुळ गीते आणि प्रसाद हिरे यांनी उमेदवारी दाखल केली आहे. हे दोघेही भाजपशी संबंधित आहेत. त्या दोघांनी नरेंद्र दराडे यांना पाठिंबा द्यावा, यासाठी मागच्या तीन-चार दिवसांपासून उदय सामंत आणि गिरीश महाजन प्रयत्न करत आहेत. पण त्यांना अजूनही यश येत नाहीय. उदय सामंत यांनी आज मीडियाशी संवाद साधला. "नाशिकच्या अपक्ष उमेदवारासोबत चर्चा झाली. महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचा विजय व्हावा म्हणून मी गिरीश महाजन यांना भेटायला आलोय. आशावादी असायला काहीच हरकत नाही. सकारात्मक निर्णय होईल" अशा विश्वास उदय सामंत यांनी व्यक्त केला. "कुणीही दबाव टाकला नाही. गणेश गीते जवळचे मित्र आहेत. गोकूळ गीते हे मित्र आहेत. विनंती हा दबाव होत नाही. मी संयमी आहे. संयमाने बोलतो. गीते भाजपला मानतात, म्हणून त्यांच्याशी चर्चा सुरू आहे. दबाव टाकायचं असतं तर चार चार वेळा मिटिंगला आलो नसतो. दबाव कसा टाकायचं मला माहीत आहे. त्याचं ज्ञान आहे" असं उदय सामंत म्हणाले. "मी आणि गिरीश महाजन हे सुद्धा संयमाने बोलत आहेत. गीतेंना आमदार व्हायचं आहे. इच्छा असणं चुकीचं नाही. एखाद्याशी चर्चा करणं हा काही ३०२ चा गुन्हा नाही.

# राज्यभर प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तत्सम अन्नपदार्थ विक्रेत्यांवर १९५ धाडी

### १ कोटी ९९ लाख १८ हजार ४७५ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त; १९२ व्यक्तींना अटक

■ मुंबई (दै. संध्या)




राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागाची प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व तत्सम अन्नपदार्थाविरुद्धची विशेष मोहीम प्रभावीपणे सुरू आहे. 1 ते 5 जून 2026 या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत तब्बल १९२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. या पाच दिवसांच्या कालावधीत राज्यभर १९५ धाडी टाकण्यात आल्या असून या कारवाईत 1 कोटी 99 लाख 18 हजार 475 रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने कळविले आहे.

अवैध उत्पादन, साठवणूक, वाहतूक व विक्रीस आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून कठोर कारवाई करण्यात येत आहे. भारतीय न्याय संहिताचे कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा मानके कायद्याचे कलम २६, २७, ३०(२) (a) आणि कलम ५९ अंतर्गत गुन्हे दाखल करून आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार प्रतिबंधित अन्नपदार्थाविरुद्ध व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. मोहिमेत 3 जून 2026 रोजी सोनगीर, जि. धुळे येथे टाकण्यात आलेल्या धाडीत 23 लाख 50 हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. 4 जून 2026 रोजी समृद्धी महामार्गावर सावंगी टोल नाका येथे करण्यात आलेल्या कारवाईत 60 लाख 50 हजार रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन तर नांदेड येथे करण्यात आलेल्या धडक कारवाईत 17 लाख 52 हजार 450 रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा व वाहन जप्त करण्यात आले. तसेच मोशी, पिंपरी-चिंचवड येथे करण्यात आलेल्या कारवाईत 6 लाख 19 हजार 982 रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करून सहा व्यक्तींविरुद्ध चिखली, पिंपरी-चिंचवड या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 5 जून 2026 रोजी प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा असल्याच्या संशयावरून करण्यात आलेल्या कारवाईत 1 कोटी 2 लाख 67 हजार 263 रुपये किंमतीचा साठा परांडा, ता. परांडा, जि. धाराशिव येथे जप्त करण्यात आला असून दोन जणांना अटक करण्यात आली आहे. बृहन्मुंबई क्षेत्रात 30 धाडीमध्ये 3 लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत 30 व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. पुणे क्षेत्रात 79 धाडीमध्ये 8 लाख 19 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून 78 व्यक्तींना अटक केली आहे, असे सह आयुक्त (अन्न) महेश ना. चौधरी यांनी कळविले आहे.

## बच्चू कडू यांच्या विधानाने खळबळ

■ मुंबई (दै. संध्या)

शिवसेनेकडून विधान परिषदेची उमेदवारी देण्यात आल्यानंतर प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. आता ते सत्तेत सहभागी असून वारंवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं गुणगान करतात मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपला लक्ष्य करताना दिसतात. आमच्या मनातील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच आहेत. शिंदे यांनीच मुख्यमंत्री व्हावी अशी इच्छाही कडू यांनी व्यक्त केली. 2029 मध्ये त्यांना मुख्यमंत्री करायचं आहे, त्यासाठी आम्ही राज्य पिंजून काढू, असंही बच्चू कडू म्हणाले. माध्यमांशी बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्यामुळे अनेकांचा भुवया उंचावल्या असून राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. आपल्याच पक्षाचा मुख्यमंत्री व्हावा अशी प्रत्येक शिवसैनिकाच्या मनातील इच्छा आहे. आमच्या मनातली मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच हेच आहेच. 2029 साली त्यांना (शिंदे) मुख्यमंत्री करायचं आहे, त्यासाठी आम्ही राज्य पिंजून काढू असं कडू म्हणाले. सध्याचेमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशाच्या सर्वोच्च पदी जावं, देवा भाऊंचं प्रमोशन व्हावं अशी इच्छाही कडू यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी बोलताना त्यांनी उद्धव ठाकरेंच्या नावाचा उल्लेख करत एक विदान केलं. '2019 मध्ये उद्धव ठाकरे यांच्यासोबत दगाफटका झाला होता. त्यामुळे दगा फटका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# एकनाथ शिंदे मुख्यमंत्री अन् देवेंद्र फडणवीस केंद्रात मंत्री?

■ भाजपच्या बड्या नेत्याने दिली सर्वात मोठी अपडेट

■ मुंबई (दै. संध्या)



शिवसेनेचे नेते बच्चू कडू यांनी मोठं विधान केलं आहे. कडू यांनी एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री पदावर पाहण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. कडू यांनी म्हटले की, 'राज्याचा मुख्यमंत्री आपल्याच पक्षाचा असावा, ही प्रत्येक शिवसैनिकाची प्रामाणिक भावना असू शकते. तसेच देवेंद्र फडणवीस यांना बढती मिळावी आणि शिंदेंकडे राज्याचे नेतृत्व यावे असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. यावर आता भाजपचे नेते आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. बच्चू कडू यांच्या विधानावर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले की, 51% बहुमत महायुतीला मिळालं आहे, सर्वात मजबूत सरकार आहे, आम्ही एकत्र आहोत. देवेंद्र फडवणीस दिल्लीत जावे हा निर्णय करण्याचा अधिकार कोणाला नाहीये. देवेंद्र फडवणीस यांना विकसित महाराष्ट्राचा संकल्प करून देशातील सर्वात अव्वल राज्य तयार करायचे आहे. देवेंद्र फडवणीस दिल्लीत जावे हा विचार कोणी करू नये. असे गावा गावांमध्ये खडे फोडून मुख्यमंत्रीपदावर बोलून आपल्या भूमिका व्यक्त करू नये. बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदावर पाहण्याची इच्छा व्यक्त केली आहे. यावर बोलताना बावनकुळे यांनी म्हटले की, प्रत्येकाला वाटते आपल्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री झाला पाहिजे. महायुतीमध्ये एकमताने देवेंद्र फडवणीस मुख्यमंत्री बनलेले आहेत. काही भूमिका अशा असतात त्या आपल्या पक्षनेत्याला विचारून भूमिका मांडायला पाहिजेत असं समन्वय समितीमध्ये ठरलं आहे. समन्वय समितीमध्ये ठरलेला निर्णय कोणी पाळत नसेल तर त्यावर चर्चा करू.

# 'अजित पवार मेला त्याने मला फरक पडला नाही', किशोर मासाळचे वक्तव्य

■ बारामती(दै. संध्या)

बारामतीतील नगरसेवक किशोर मासाळ याची एक ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. हयात असताना अजितदादांनी ज्याच्यावर जीवापाड प्रेम केलं, तो हा नगरसवेक आहे. अजित पवार यांच्या पक्षाचा हा नगरसेवक आहे. अजित पवार या किशोर मासाळच भरभरुन कौतुक करायचे. अजित पवार यांच्या आवडत्या लोकांच्या यादीत तो होता. पण तोच किशोर मासाळ आता अजित पवारांबद्दल जे बोलला, त्यावरुन सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. अजित पवार मेला त्याने मला फरक पडला नाही, असे या नगरसेवकाचे शब्द आहेत. एका महिलेबरोबर बोलतानाचा किशोर मासाळची क्लिप व्हायरल झाली आहे. राजकारणात लोक किती कृतघ्न असतात, त्याचं हे उत्तम उदहारण आहे. हा किशोर मासाळ ज्या महिलेबरोबर बोलतोय त्यात बिअर पिण्याचा सुद्धा उल्लेख आहे. रुपाली ताई मेली पाहिजे, अजित पवार मेला त्याने मला फरक पडला नाही असं हा मासाळ म्हणतो. त्याचवेळी फोनवर बोलणारी महिला म्हणते मी मेली तरी तुला फरक पडणार नाही, त्यावर तो नाही फरक पडणार असं बोलतो. ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर किशोर मासाळला आपल्या बोलण्याता पश्चाताप झाला आहे. "चार दिवसांपूर्वी माझी ऑडिओ क्लिप व्हायरल झाली.

# इराण-इस्त्रायल युद्धात भारताचा तडकाफडकी मोठा आदेश, भारतीयांसाठी महत्त्वाच्या सूचना जारी!

■ मुंबई (दै. संध्या)



युद्ध संपवण्यासाठी इराण आणि अमेरिका यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. परंतु या चर्चेतून काहीही ठोस असं समोर आलेलं नाही. उलट दोन्ही देश एकमेकांच्या भूमिकांवर ठाम असल्याने कोणत्याही क्षणी युद्ध पुन्हा भडकण्याची भीती व्यक्त केली जात होती. आता हीच भीती खरी ठरली आहे. इस्त्रायल आणि इराण या दोन्ही देशांनी एकमेकांवर मोठे हल्ले केले आहेत. हे हल्ले एवढे भीषण आहेत की, पुन्हा एकदा युद्ध सुरू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. नव्याने सुरू झालेल्या या हल्ल्यानंतर आता भारतानेही सावध पवित्रा घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार इस्त्रायल आणि इराण यांच्यातील नवा संघर्ष लक्षात घेऊन भारताने आपल्या नागरिकांसाठी काही सूचना केल्या आहेत. इराणमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी काळजी घ्यावी. सतर्क राहावे, असे भारतीय प्रशासनाने आवाहन केले आहे. तसेच भारतीय नागरिकांनी लवकरात लवकर इराणमधून बाहेर पडावे, असेही भारताने सूचवले आहे. भारतीय नागरिकांनी सध्या इराणची यात्रादेखील करू नये, इराणला जाणे टाळावे, असा सल्ला भारतीय प्रशासनाने दिला आहे. तेहरान येथील भारतीय दूतावासाने या सूचना जारी केल्या आहेत. "सध्याची इराणमधील बिघडलेली परिस्थिती लक्षात घेता आम्ही भारतीयांनी इराणमध्ये जाण्याचे टाळावे, असा सल्ला देत आहोत. सध्या जे भारतीय नागरिक इराणमध्ये आहेत, त्यांनीदेखील लवकरत लवकर कोणत्याही मार्गाने इराण देश सोडावे," असेदेखील इराणमध्ये असलेल्या भारतीय दूतावासाने आपल्या सूचनांमध्ये म्हटले आहे. दरम्यान, एकीकडे इराणची अमेरिकेसोबत शांततेसाठी चर्चा सुरू असतानाच इराणने रविवारी रात्री उशिरा इस्त्रायलवर हल्ला केला. इस्त्रायलकडून लेबॉननवर हल्ले केले जात आहेत. याच हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने हा हल्ला केला होता.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 45 किमी प्रवासात लालपरी 5-6 वेळा बंद पडली, प्रवाशांवरच ढकलण्याची वेळ

कवठे येमाई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राजगुरुनगर आगाराच्या भोंगळ कारभाराचा फटका सोमवारी (ता. ८) सकाळी प्रवाशांना बसला. राजगुरुनगरहून कवठे येमाई मार्गे शिरूरकडे येणारी एसटी बस (एमएच १४ बीटी ४७९७) शिंदेवाडी (ता. शिरूर) येथे अचानक बंद पडल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. विशेष म्हणजे ही बस राजगुरुनगरपासून शिंदेवाडीपर्यंत ४५ किलोमीटरच्या प्रवासात तब्बल पाच ते सहा वेळा बंद पडली. वारंवार बंद पडणारी बस सुरू करण्यासाठी चालकाला अनेकदा प्रयत्न करावे लागले. मात्र, शिंदेवाडी येथे बस पूर्णपणे बंद पडल्याने चालक-वाहकांनी प्रवाशांकडे मदतीची विनंती केली. त्यानंतर भर उन्हात प्रवाशांनीच बसला धक्का देत ती सुरू करण्याचा प्रयत्न केला. अष्टविनायक महामार्गावर काही काळ अक्षरशः प्रवाशांना एसटी ढकलण्याची वेळ आली. तरीही बस सुरू न झाल्याने प्रवाशांचा खोळंबा झाला. या प्रकारामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अखेर अनेक प्रवाशांना रस्त्याकडेला उभे राहून मिळेल त्या वाहनाने पुढील प्रवास करावा लागला. बसची दयनीय अवस्था आणि प्रशासनाची अनास्था पाहून प्रवाशांनी एसटी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. एसटी महामंडळाच्या अनेक बसेस नियमित देखभाल व दुरुस्तीअभावी रस्त्यातच बंद पडत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेशी संबंधित या प्रश्नाकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी एसटी बसच्या देखभालीबाबत तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

### बेल्हा-जेजुरी महामार्गावरील नवीन पुलाचे काम अद्याप अपुर्णच

पारगाव (दैनिक संध्या) : दरवर्षी पावसाळ्यात डींभा धरण भरल्यावर घोडनदीत मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात येते. घोडनदीला पुर आला की लाखणगाव (ता. आंबेगाव) येथील बेल्हा जेजुरी महामार्गावरील घोडनदीवरील जुना पुल पाण्याखाली जातो त्यावेळी या पुलावरील वहातुक ठप्प होते तसेच दरवर्षी पुराच्या पाण्याने पुलाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते जुना पूल जड वाहनांच्या वहातुकीसाठी धोकादायक बनल्याने सुमारे तीन वर्षापासून कासव गतीने सुरु असलेले नवीन पुलाचे काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. बेल्हे जेजुरी महामार्गाचे नव्याने काम झाल्याने या रस्त्यावरील वाहनांची वहातुक वाढली आहे. नाशिक, नगर जिल्ह्यातील नागरिकांना सोलापूर, सातारा, कोल्हापूर या ठिकाणी जाण्यासाठी जवळचा मार्ग असल्याने या रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते परंतु दरवर्षी पावसाळ्यात घोडनदीला पुर आल्यावर जुन्या पुलावरून पाणी वाहु लागते त्यावेळी महामार्गावरील वहातुक ठप्प होते. दरवर्षी पुराच्या पाण्याने जुन्या पुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. सार्वजनिक बांधकाम विभाग दरवर्षी तात्पुरती दुरुस्ती करत आहे. हा पूल जड वाहनांच्या साठी वहातुकीला धोकादायक बनला आहे अनेकदा या पुलावर जड वाहनांस अपघात झाले आहे. या ठिकाणी सुमारे १० कोटी रुपये खर्चाच्या नवीन पुलाचे काम सुरु झाले ६० ते ७० टक्के काम झाले आहे. परंतु तीन वर्षापासून ते अर्धवट अवस्थेत बंद पडले आहे. काही महिन्यापासून पुलाचे काम पुन्हा सुरु झाले थोडेफार काम झाले त्यानंतर पुन्हा काम बंद पडले आहे. अद्याप ते काम सुरु झाले नाही. पावसाळा तोंडावर आला आहे यावर्षीही पुलाचे काम अर्धवट असल्याने नदीला पुर आल्यास पुलावरून पाणी वाहु लागल्यास या महामार्गावरील वहातुक ठप्प होऊन नागरिकांची गैरसोय होणार आहे. त्यामुळे पुलाचे काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी आंबेगाव तालुका शेतमाल प्रक्रिया संस्थेचे अध्यक्ष सतीश रोडे पाटील व पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज यांनी केली आहे.

### महामार्गावर अपघाताचा थरार; पिकअप-दुचाकीची जोरदार धडक, एकाचा मृत्यू

ओतूर (दैनिक संध्या) : अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर करंजाळे (ता. जुन्नर) गावच्या हद्दीत रविवारी (ता. ७) सकाळी पिकअप आणि दुचाकीच्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. रामदास दशरथ घोगरे (वय ४०, रा. खानगाव, ता. जुन्नर) असे मृताचे नाव असून, अपघातानंतर पिकअप चालक वाहन सोडून फरार झाला. अधिक माहितीनुसार, रविवारी सकाळी १० च्या सुमारास हॉटेल छत्रपतीजवळील वळणावर हा अपघात झाला. माळशेज बाजूकडून ओतूरकडे येणाऱ्या पिकअपची (एमएच १४ केए ४३७७) समोरून येणाऱ्या दुचाकीला (एमएच १४ ईजे ७८६३) जोरात धडक बसली.

# माईंच्या लेकी-जावयांचा सन्मान’ सोहळ्यात उसळला भावनांचा महापूर

## • दिपकदादा यांच्याविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त • ममता सिंधुताई सपकाळ यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा



सासवड (दै. संध्या)

पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांनी उभारलेल्या विशाल कुटुंबातील मायेचा, संस्कारांचा आणि नात्यांच्या जिव्हाळ्याचा प्रत्यय आज पुन्हा एकदा आला. ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण येथे अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या “अधिक मासाचे वाण-माईंच्या लेकजावयांचा सन्मान” या आगळ्यावेगळ्या सोहळ्यात भावनांचा अक्षरशः महापूर उसळला.

यावेळी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या ममता सिंधुताई सपकाळ, कीर्ती, ज्योती, मंजुषा आणि गौरी यांनी अतिशय भावनाविवश होत आपल्या भावना व्यक्त केल्या. “माईंचे पहिले मानसपुत्र दीपकदादा गायकवाड हेच आमच्या सर्व लेकींसाठी खरे माहेर आहेत. दादा आजही कुटुंबप्रमुख म्हणून जबाबदारीने भूमिका पार पाडत आहेत. ते आम्हाला कधीच विसरत नाहीत, याचा आम्हाला अभिमान आहे. आमच्या लेकरांना त्यांच्या रूपाने प्रेमळ, कर्तृत्ववान आणि निरागस मनाचा मामा लाभला आहे. प्रत्येकाची मनापासून काळजी घेणारा असा भाऊ आजच्या युगात दुर्मिळ आहे,” असे सांगताना त्यांचा कंठ दाटून आला. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या, तर भव्य मंडपातील अनेकांचे डोळेही पाणावले.

पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांनी १९९२ साली स्थापन केलेल्या ममता बाल सदन संस्थेत आजपर्यंत तब्बल २२० मुलींची थाटामाटात लग्ने लावून दिली आहेत. या सर्व लेकी आज आपल्या संसारात सुखाने नांदत असून माईंच्या कुटुंबात आज २२० लेक-जावयांचा मोठा परिवार निर्माण झाला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेनुसार तीन वर्षांतून एकदा येणाऱ्या अधिक मासाला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. याच परंपरेचे जतन करत माईंच्या संस्थेने “अधिक मासाचे वाण – माईंच्या लेकजावयांचा सन्मान” हा उपक्रम राबविला. या सोहळ्यासाठी लेकी व त्यांच्या जावयांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी जावयांना नवीन पोशाख, तर लेकींना साडी-चोळी, जोडवे (बिचवे), तामणदीप, निरंजन, ३३ अनारसे आणि तुळशीचे रोप अशा पारंपरिक भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. ज्या प्रेमाने आणि आदराने प्रत्येक वडील अधिक मासात आपल्या लेकीला घरी बोलावून तिचा सन्मान करतात, त्याच संस्कृतीचे पालन करत ‘बापमाणूस’ म्हणून दीपकदादा गायकवाड यांनी माईंची परंपरा जिवंत ठेवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ममता बाल सदन (बालगृह)चे अध्यक्ष दीपक गायकवाड होते. यावेळी सिंधुताई सपकाळ यांचे चिरंजीव अरुणभाऊ सपकाळ, लामा फेरा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सत्येंद्र शुक्ला, शर्मिष्ठा जाधव, अनुश्री रिसवाडकर, शास्वती रिसवाडकर, बजरंग वाघ, चिंतामणी हॉस्पिटलचे डॉ. संजय रावळ, डॉ. दिलीप वाघोलीकर, डॉ. वांढेकर, डॉ. शेट्टी, अनिकेत खरे, पूजा खरे आणि शीतल सिनगारे, विनय सपकाळ, मनीष बोपटे, देविदास अरबट आदी मान्यवर उपस्थित होते. सोहळ्यासाठी सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सन्मानपत्र आणि तुळशीचे रोप देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ममता बाल सदन संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. माईंच्या विचारांची, संस्कारांची आणि ममतेची परंपरा आजही तितक्याच ताकदीने पुढे चालत असल्याचे हे भावस्पर्शी चित्र पाहून उपस्थित प्रत्येकाचे मन भारावून गेले.

### कृतज्ञता आणि अश्रूंच्या साक्षीने भारावला परिसर

काही नाती रक्ताची नसतात, पण ती रक्ताच्या नात्यांपेक्षाही अधिक घट्ट असतात. काही घरे विटा-मातीची नसतात, ती मायेने उभी राहतात. आणि काही माहेरं आई गेल्यानंतरही संपत नाहीत. ती एखाद्या माणसाच्या रूपाने कायम जिवंत राहतात. ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण येथे आज असेच एक भावविश्व उभे राहिले आणि संपूर्ण परिसर मायेच्या, कृतज्ञतेच्या आणि अश्रूंच्या साक्षीने भारावून गेला. माईंच्या जाण्यानंतरही त्यांचे कुटुंब विखुरले नाही; उलट मायेच्या धाग्यांनी आणखी घट्ट विणले गेले आहे. आणि त्या धाग्यांना जपणारे नाव म्हणजे दिपकदादा असे भाव, यावेळी उमटल्याचे दिसून आले.

### अनेक लोकप्रतिनिधींनी दिल्या भेटी

अधिक मास सोहळ्यात माजी आ. अशोक टेकवडे, सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सौ. राजवर्धिनीताई जगताप, जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, रश्मी कोलते, हरिभाऊ लोळे, शशिकला विजय कोलते, न्यायालयाचे संजय खामकर, पंचायत समिती सभापती प्रवीण जगताप, जितेंद्र कांबळे, पांडुरंग भोसले, उद्योजक अजित गोळे, यांच्यासह जिल्हयातील अनेक लोकप्रतिनिधींनी सदिच्छा भेट देऊन लोकजावयांना आशीर्वाद दिले. एवढंच नव्हे तर राज्याच्या कानाकोपऱ्यातून अनेकांनी या सोहळ्याला हजेरी लावली. ठाणे येथील ८० वर्षीय रंजना गायकवाड यांनी सुद्धा सोहळ्यात उपस्थित राहून आशीर्वाद दिले.

## विद्यापीठे, उद्योग आणि संशोधन संस्थांमध्ये भागीदारीची गरज : राज्यपाल जिष्णू देव वर्मा

पुणे (दै. संध्या)

"उच्च आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मोठी क्षमता असून, केवळ पदवीधर नव्हे, तर भावी संशोधक, उद्योजक आणि राष्ट्रनिर्माते घडविण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थांवर आहे. यासाठी विद्यापीठे, उद्योग आणि विविध आर्थिक मंचांमध्ये सखोल सहकार्य आणि भागीदारीची गरज आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी केले.

हिंदू इकॉनॉमिक फोरम (एचईएफ) पुणे डिस्ट्रिक्ट चॅप्टरच्या वतीने आयोजित पहिल्या ‘शक्ती समिट २०२६’, उद्योजकता परिषदेचा समारोप राज्यपाल वर्मा यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमावेळी लेफ्ट. जनरल (निवृत्त) अजयकुमार सिंग, क्विन्टेसेंशियल फ्रॅग्रन्स प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष भरत कामठे, ॲक्युरेट ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक किरण जाधव, हिंदू इकॉनॉमिक फोरमचे अध्यक्ष गौरव त्रिपाठी, संकेत खरपुडे आदी उपस्थित होते. तत्पूर्वी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशनच्या नियामक मंडळाचे सदस्य दीपक करंजीकर, भारत फोर्जचे राजेंद्रसिंग भाटिया यांच्या हस्ते समिटचे उद्घाटन झाले. ‘शक्ती समिट’चे कौतुक करीत जिष्णू देव वर्मा म्हणाले, "हे व्यासपीठ उद्योजक, गुंतवणूकदार, संशोधक, स्टार्टअप, लघुउद्योग, धोरणकर्ते आणि विचारवंत यांना एकत्र आणून भारताच्या आर्थिक आणि धोरणात्मक विकासासाठी दिशा देणारे आहे. ‘धोरणात्मक क्षेत्रांतील संधी’ ही नवीन भारताच्या आकांक्षांचे प्रतीक आहे. आत्मविश्वासू, आत्मनिर्भर, तंत्रज्ञानसंपन्न आणि सांस्कृतिक मूल्यांशी जोडलेला भारत उभारण्यासाठी ज्ञान, नावीन्य, संघटनशक्ती, उद्यमशीलता आणि शिस्त यांचे सामर्थ्य राष्ट्रीय हिताशी जोडणे आवश्यक आहे. जगभरात सुरू असलेले संघर्ष, बदलणारे भू-राजकीय समीकरण आणि जागतिक पुरवठा साखळीतील बदल यामुळे भारतासमोर मोठ्या संधी निर्माण होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण, अवकाश, रोबोटिक्स, प्रगत उत्पादन, ऊर्जा, आरोग्य आणि डिजिटल अर्थव्यवस्था ही आता केवळ उदयोन्मुख क्षेत्रे नसून राष्ट्रीय सामर्थ्याची प्रमुख आधारस्तंभ ठरत आहे."

## शिवराज्याभिषेक दिनी सोमेश्वरवाडीत रक्तदानाचा विक्रम

### १२०३ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग : नातं रक्ताचं शिवभक्तांचं

पुणे (दै. संध्या)

“स्वराज्याचा सन्मान राखुया, चला रक्तदान करूया” या प्रेरणादायी संदेशासह छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सोमेश्वरवाडी,पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात तब्बल १२०३ रक्तदात्यांनी रक्तदान करून विक्रमी सहभाग नोंदविला. मानवतेची सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे आयोजन सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट, श्री विठ्ठल सेवा मंडळ (एक गाव एक गणपती), सोमेश्वरवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच नगरसेवक सनी विनायक निम्हण यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते.



“नातं रक्ताचं शिवभक्तांचं” या संकल्पनेवर आधारित या रक्तदान महोत्सवाचे यंदाचे सलग सहावे वर्ष होते. शिवराज्याभिषेक दिनाच्या पावन पर्वावर आयोजित या उपक्रमाला युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिणामी, १२०३ रक्तदात्यांच्या सहभागामुळे हा उपक्रम परिसरातील सर्वात मोठ्या सामाजिक उपक्रमांपैकी एक ठरला.

“तेच ठिकाण, तोच दिन पावन... रक्तदानातून घडवू नवे जीवन!” या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी अधोरेखित केली. रक्ताच्या एका पिशवीमुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते, या जाणीवेने नागरिकांनी रक्तदानासाठी मोठी गर्दी केली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकर्ते, स्वयंसेवक, वैद्यकीय पथके, विविध सामाजिक संस्था तसेच सर्व रक्तदात्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे हा सामाजिक उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी नगरसेवक सनी निम्हण म्हणाले, “रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्याच्या जीवनाला नवसंजीवनी देणारे श्रेष्ठ कार्य आहे. शिवराज्याभिषेक दिनासारख्या प्रेरणादायी दिवशी नागरिकांनी दाखविलेला सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी अत्यंत कौतुकास्पद आहे. रक्तदानातून आपण केवळ रक्त देत नाही, तर एखाद्या कुटुंबाला आशेचा किरण देत असतो. भविष्यातही असे सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येतील.”

शिवराज्याभिषेक दिनी झालेल्या या रक्तदान महोत्सवामुळे सामाजिक सेवेला नवी उंची मिळाली असून, नागरिकांच्या विक्रमी सहभागातून मानवतेचा संदेश अधिक दृढ झाला आहे.

## महावितरणचा २१वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्रात या वर्षी विजेची उच्चांक मागणी नोंदविण्यात आली. महावितरणने ही मागणी विनाअडथळा पूर्ण केली. प्रभावी नियोजन, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेची परिणामकारक अंमलबजावणी, कृषी पंपाचे विक्रमी सौर उर्जीकरण तसेच नवीकरणीय ऊर्जेची मोठ्या प्रमाणात निर्मिती व वापर यामुळे महावितरणला विजेची वाढती मागणी पूर्ण करणे शक्य झाले. आगामी काळात विजेची वाढती मागणी तसेच शेतकऱ्यांसह सर्व वर्गवारीतील ग्राहकांना अखंडित व स्वस्त दरांत वीज पुरवठा करण्यास महावितरण पूर्णपणे सक्षम आहे, अशी ग्वाही महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांनी दिली. तसेच कंपनी शेअर बाजारात लिस्टिंग होणार असल्याने महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी सर्वानीच मिशन मोड वर काम करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## जागतिक ट्यूमर दिन : प्रगत उपचारांमुळे मेंदूच्या ट्यूमरवर मात शक्य



(दै. संध्या)

दरवर्षी ८ जून रोजी साजरा केला जाणारा जागतिक ट्यूमर दिन हा मेंदू आणि मज्जासंस्थेशी संबंधित ट्यूमरविषयी जनजागृती करण्यासाठी महत्त्वाचा दिवस मानला जातो. मेंदू किंवा पाठीच्या कण्यातील ट्यूमरचे निदान रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी धक्कादायक ठरू शकते. मात्र, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर आणि वेळेवर निदान यांच्या मदतीने या आजारावर प्रभावी उपचार करणे आज पूर्वीपेक्षा अधिक शक्य झाले आहे.

ट्यूमर म्हणजे शरीरातील पेशींची अनियंत्रित वाढ. मेंदूतील ट्यूमर सौम्य (Benign) किंवा घातक (Malignant) असू शकतो. सुरुवातीच्या टप्प्यात डोकेदुखी, अचानक येणारे झटके (Seizures), दृष्टीदोष, स्मरणशक्तीतील बदल, संतुलन बिघडणे किंवा व्यक्तिमत्त्वात होणारे बदल यांसारखी लक्षणे दिसून येऊ शकतात. अनेकदा ही लक्षणे दुर्लक्षित केली जातात, त्यामुळे निदान उशिरा होते. त्यामुळे अशा कोणत्याही लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

मेंदूच्या ट्यूमरच्या उपचारांमध्ये बहुविद्याशाखीय (Multidisciplinary) दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा असतो. न्यूरोसर्जन, न्यूरोलॉजिस्ट, रेडिओलॉजिस्ट, अतिदक्षता तज्ज्ञ आणि पुनर्वसन तज्ज्ञ यांच्या समन्वयातून रुग्णाला सर्वसमावेशक उपचार मिळतात. अशा एकात्मिक उपचारपद्धतीमुळे निदानापासून ते शस्त्रक्रियेनंतरच्या पुनर्वसनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर रुग्णाला सर्वोत्तम वैद्यकीय सेवा मिळते.

मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील न्यूरोसायन्स विभाग आधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवी तज्ज्ञांच्या साहाय्याने मेंदू व मणक्याच्या ट्यूमरच्या उपचारांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. न्यूरो-नेव्हिगेशन प्रणाली, अत्याधुनिक न्यूरोइमेजिंग, प्रगत न्यूरो-आयसीयू आणि कमीत कमी छेदातून (Minimally Invasive) शस्त्रक्रिया करण्याच्या सुविधा उपलब्ध असल्यामुळे गुंतागुंतीच्या ट्यूमरवरही प्रभावी उपचार शक्य होत आहेत.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे मेंदू व मणक्याच्या शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. विवेक बोंडे सांगतात, “मेंदूच्या ट्यूमरवरील शस्त्रक्रियेमध्ये अचूकता अत्यंत महत्त्वाची असते. अनेक वेळा यश आणि गुंतागुंत यातील फरक केवळ काही मिलिमीटरचा असतो. आधुनिक न्यूरो-नेव्हिगेशन तंत्रज्ञानामुळे ट्यूमर सुरक्षितपणे काढून टाकताना मेंदूच्या महत्त्वाच्या कार्यांचे संरक्षण करता येते.”

याचप्रमाणे न्यूरोलॉजिस्ट आणि जेरियाट्रिक न्यूरोलॉजिस्ट डॉ. कुणाल जाधव यांचे मत आहे की, “ट्यूमरचे केवळ उपचारच नव्हे तर त्याचे अचूक निदान, रुग्णाच्या न्यूरोलॉजिकल स्थितीचे मूल्यांकन आणि शस्त्रक्रियेनंतरची काळजी याही तितक्याच महत्त्वाच्या बाबी आहेत. विशेषतः वृद्ध रुग्णांमध्ये इतर सहव्याधींसह ट्यूमरचे व्यवस्थापन करावे लागते. त्यामुळे वैयक्तिक गरजांनुसार उपचार नियोजन आवश्यक ठरते.”

आजच्या काळात उच्च दर्जाच्या एमआरआय, सीटी स्कॅन आणि इतर प्रगत निदान तंत्रज्ञानामुळे ट्यूमरचे लवकर निदान करणे शक्य झाले आहे. तसेच शस्त्रक्रियेनंतरच्या पुनर्वसन उपचारांमुळे रुग्णांना दैनंदिन जीवनात पुन्हा सक्रिय होण्यास मदत मिळते.

जागतिक ट्यूमर दिनानिमित्त प्रत्येकाने आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याची गरज आहे. सततची डोकेदुखी, अचानक येणारे झटके, बोलण्यात किंवा हालचालींमध्ये बदल, स्मरणशक्ती कमी होणे यांसारखी लक्षणे आढळल्यास त्वरित तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. वेळेवर निदान आणि योग्य उपचारांमुळे मेंदूच्या ट्यूमरवर यशस्वीपणे मात करता येते आणि रुग्णांना नव्या आशेने जीवन जगता येते.

